आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ११८ । शुक्रवार ६ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com




## तळघर, पार्किंग विकणे बेकायदेशीर : उच्च न्यायालय

**मुंबई :** तळघर (बेसमेंट) आणि पार्किंगसारख्या जागा या इमारतीतील सामायिक सुविधा मानल्या जातात. त्यामुळे त्या स्वतंत्र मालमत्ता म्हणून विकता येत नाहीत किंवा त्या आधारे सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व मिळवता येत नाही, असा महत्त्वाचा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला. बुधवारी दिलेल्या या निर्णयामुळे गृहनिर्माण क्षेत्रात स्पष्टता निर्माण झाली असून, भविष्यात अशा प्रकारच्या वादांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. . अमित बोरकर यांच्या एकलपीठाने अमानुल एकरामुल अन्सारी यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना हा निर्णय दिला. सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व हे केवळ मंजूर आराखड्यानुसार वैध फ्लॅटच्या मालकीवर आधारित असते, खासगी व्यवहारांद्वारे मिळालेल्या ताब्यावर नव्हे, असे न्यायालयाने ठामपणे नमूद केले.

# मोदीची कब्र खोदण्याचे काँग्रेसचे स्वप्न

## पंतप्रधान मोदींचा राज्यसभेत विरोधकांवर हल्ला; काँग्रेसचा सभात्याग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : 'मोहब्बतची दुकान' उघडणाऱ्यांनी मोदी तेरी कब्र खुदेगी असे नारे द्यायला सुरुवात केली आहे. ही कोणती 'मोहब्बतची दुकान' आहे जी देशातीलच एखाद्या नागरिकाची कब्र खोदण्याचे स्वप्न पाहत आहे? त्यांनी हे कोणत्या संविधानातून शिकले? हा मानवतेचा अपमान नाही का? पण त्यांना याचा तिळमात्र खेदही नाही. आणि नंतर ते म्हणतील की राज्यसभेत पंतप्रधान मोदी रडत होते. कोणत्या संस्कारांत वाढलेले लोक आहेत हे? अशी उद्विग्नता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेतील भाषणातून व्यक्त केली.



पंतप्रधान मोदींचे भाषण सुरू होताच राज्यसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी 'तानाशाही नही चलेगी' अशी घोषणाबाजी केली. त्यावर, मोदींनी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांना टोला लगावला. आदरणीय खर्गेंची तुमचं वय लक्षात घेता तुम्ही खाली बसूनच नारेबाजी करावी, इथे तरुण खासदारही आहेत, असे म्हणत खर्गेंना टोमणा लगावला. त्यानंतर, विरोधकांनी राज्यसभेतूनही वॉकआऊट केले. त्यानंतर, मोदींनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली.

आपला देश आज वेगाने पुढे जात असून आपण थांबायचे नाही, मागे वळून पाहायचे नाही. जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा जगातील ६ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होता. मात्र, काँग्रेसने देशाची अर्थव्यवस्था १० व्या क्रमांकावर नेऊन ठेवली होती. पण, विश्वकल्याणाचा मार्ग स्वीकारत आपण भूमिका बजावत आहोत. आज जागतिक स्तरावर भारत दक्षिण विश्वाची आवाज बनला आहे. जग नव्या दिशेने पुढे जात असून भारत देश पार्टनर आहे. काँग्रेसमुळे देशाची जी प्रतिमा बनली होती, ती प्रतिमा पुसण्यातच आपली अधिक मेहनत खर्ची होत असल्याचे मोदींनी म्हटले. लाल किल्ल्यावरुन काँग्रेसच्या पंतप्रधानांची भाषणं ऐका, त्यातून ना कुठला विचार दिसेल, ना दृष्टी ना दृष्टीकोन असे म्हणत मोदींनी राज्यसभेतून पुन्हा काँग्रेसच्या युपीए सरकारवर निशाणा साधला.

भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या ट्रेड डीलवरुनही मोदींनी भारताची जगभरात वाढत असलेली ताकद सांगितली. देशातील तरुणाईला या ट्रेड कराराचा सर्वाधिक लाभ होणार आहे. भारतातील प्राध्यापकांनाही जागतिक स्तरावर नवीन संधी उपलब्ध होतील,असे मोदींनी सांगितले. काँग्रेसने देशातील अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केलं. देशात १० कोटी असे शेतकरी आहेत, ज्यांकडे २ एकरपेक्षा कमी जमीन आहे. काँग्रेसने या शेतकऱ्यांकडे कधी पाहिलंच नाही, केवळ बड्या लोकांना सोबत घेतलं म्हणजे झालं अशीच काँग्रेसची भूमिका होती, असेही मोदींनी संसदेत म्हटले.

### प्लॅनिंग कमिशन बरखास्त करून निती आयोग...

**स्व. इंदिरा गांधींनी ज्या प्लॅनिंग कमिशनवर सडकून टीका केली, त्या प्लॅनिंग कमिशनचे जन्म दाता हेच त्यांचेच वडिल पंडित जवाहरलाल नेहरू होते. सन २०१४ पर्यंत सर्वजण प्लॅनिंग कमिशन पाहात होते, पण त्याच्या सुधारणेसाठी कुणीही प्रयत्न केले नाहीत. मात्र, २०१४ मध्ये आम्हाला संधी मिळाली अन् आम्ही प्लॅनिंग कमिशन बरखास्त करत नीति आयोगाची स्थापना केली.**

# पंतप्रधानांच्या उत्तराशिवायच राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील 'आभाराचा प्रस्ताव' मंजूर

## इतिहासातील पहिलीच घटना : लोकसभेत मोठा गोंधळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** भारतीय संसदेच्या इतिहासात गुरुवारी एक अत्यंत धक्कादायक आणि अभूतपूर्व प्रकार पाहायला मिळाला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील 'आभाराचा प्रस्ताव' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तराशिवाय लोकसभेत मंजूर करण्यात आला. विरोधकांच्या प्रचंड गदारोळामुळे आणि सुरक्षेच्या कारणास्तव उद्भवलेल्या तणावामुळे हा निर्णय घेण्यात आला.

सूत्रांनी दिलेल्या खळबळजनक माहितीनुसार, लोकसभेत काँग्रेस खासदारांकडून पंतप्रधान मोदींवर शारीरिक हल्ला करण्याची योजना आखण्यात आली होती. या कृत्यासाठी महिला खासदारांना 'कव्हर' म्हणून पुढे करण्यात आले होते, असा दावा सूत्रांनी केला आहे. सभागृहात पंतप्रधान उपस्थित असतानाही, संभाव्य धोका आणि गोंधळ लक्षात घेता सभापती ओम बिर्ला यांनी पंतप्रधान मोदींच्या भाषणाशिवाय 'व्हॉइस व्होट'द्वारे (आवाजी मतदानाने) प्रस्ताव मंजूर केला आणि कामकाज स्थगित केले.

विरोधी पक्षांच्या सततच्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचे कामकाज सकाळपासूनच विस्कळीत झाले होते. यावर प्रतिक्रिया देताना निलंबित काँग्रेस खासदार माणिकम टागोर यांनी स्पष्ट भूमिका मांडली. ते म्हणाले. जोपर्यंत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना त्यांचे मत मांडू दिले जात नाही, तोपर्यंत आम्ही पंतप्रधानांना बोलू देणार नाही. हा **(पान ४ वर)**

### पंतप्रधानांचे भाषण हुकले; लोकशाहीवर प्रश्नचिन्ह

**बुधवारीच पंतप्रधान उत्तर देणार होते, पण गोंधळामुळे ते शक्य झाले नाही. आज अखेर भाषणाविनाच प्रस्ताव मंजूर करावा लागला. लोकसभेत बोलता आले नसले तरी, पंतप्रधान आज राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तर देण्याची शक्यता आहे. विरोधकांनी या प्रक्रियेला लोकशाहीची गळा घोटला असे म्हटले आहे, तर सत्ताधारी गोटातून विरोधकांच्या वर्तवणुकीवर कडक टीका होत आहे.**

## महत्त्वाचे..



### सोने वधारले; चांदीच्या दरात पून्हा घसरण

**मुंबई :** सोने आणि चांदीच्या दरात दोन दिवसांच्या तेजीनंतर घसरण सुरु झाली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव कमी होण्याची शक्यता आणि डॉलर मजबूत झाल्यानं सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली. चांदीचे दर आज ३०२३० रुपयांनी कमी झाले. तर, सोन्याचे दर ३६१७ रुपयांनी वाढले. आजचा जीएसटीशिवायचा सोन्याचा दर १५३०१२ रुपये प्रति तोळा आहे. तर, चांदीचा दर २५२२३२ रुपये किलो आहे. जीएसटीसह सोन्याचा दर १५७६०२ रुपये आणि चांदीचा दर २५९७९८ रुपये आहे. बुधवारी चांदीचा जीएसटीशिवायचा दर २८२४६२ रुपये किलो होता. सोन्याचा जीएसटीशिवाय १५६६२५ रुपये तोळा होतं. सराफा बाजारात सोन्याच्या दरानं १७६१२१ रुपये तोळा असा उच्चांक गाठला होता. त्या तुलनेत सोन्याचा दर २३१०९ रुपयांनी घसरला आहे. तर, चांदीचा दर २९ जानेवारीच्या ३८५९३३ रुपयांच्या उच्चांकावरुन १३३७०१ रुपयांनी स्वस्त झाली आहे.


(छाया–सुधीर चव्हाण नेवासा)

## श्री मोहिनीराजांच्या उत्सवमूर्तीचे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा येथील श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात यात्रा काळात दर्शनासाठी ठेवण्यात आलेल्या श्री मोहिनीराजांच्या उत्सवमूर्तीचे गुरूदेव दत्त पीठ देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

यावेळी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या आगमन प्रसंगी वेदमंत्राच्या जयघोषात श्री उत्सवमूर्तीचे पूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. बोल मोहिनीराज महाराज की जय असा जयघोष उपस्थित भाविकांनी यावेळी केला. देवस्थानच्या वतीने बाळासाहेब पाटील, रविंद्र जोशी,जयंत देवचक्के,नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,रविंद्र मुनोत,दत्तात्रय जोशी, बाळू महाराज कानडे यांच्या वतीने गुरुवर्य श्री भास्करगिरीजी **(पान ४ वर)**

## साई संस्थान 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने सन्मानित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड कडून साईबाबा संस्थानला ऑनर सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले आहे.

श्री साईबाबांच्या कृपेने लाखो भाविकांच्या श्रद्धास्थान ठरलेल्या या संस्थेच्या कार्याची दखल घेऊन विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चे अध्यक्ष व १८४ वर्ल्ड रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय **(पान ४ वर)**

# पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षणाच्या नावाखाली मुलींवर बलात्कार!

## जबरदस्तीने गर्भपात व वारंवार छळ केल्याची जावेद शेख विरुद्ध तरुणीची फिर्याद




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** पुणे जिल्ह्यातील एक युवती पोलीस दलात आपले करिअर घडवण्यासाठी श्रीगोंदा येथील रनर्स क्लब अकॅडमी मध्ये भरती झाल्यावर अकॅडमी चालकाने तिच्याशी जवळीक साधून वारंवार बलात्कार करत जबरदस्तीने गर्भपात केल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(एम)(एफ), ७५(१), ८८, ३५१(१) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले आहेत.

पुणे जिल्ह्यातील एक युवती उच्च शिक्षण घेण्यासाठी श्रीगोंद्यातील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय श्रीगोंदा या ठिकाणी आली. पोलीस भरती व्हायचे स्वप्न उराशी तिने बाळगले होते. त्यासाठी महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर श्रीगोंद्यातील जावेद शेख यांची रनर्स क्लब अकॅडमी जॉइन केली. मात्र डिसेंबर २०२४ मध्ये पोलीस भरती ग्राउंडची तयारी करत असताना तिचा अचानक पाय लचकला याबाबत तिने उपचारासाठी अकॅडमी चालक जावेद शेख (रा. मूळ गाव दूरगाव, ता कर्जत हल्ली रा. जकातेवस्ती वस्ती, श्रीगोंदा ) यांना विचारणा केली असता त्याने दुसऱ्या दिवशी पहाटे लवकर ग्राउंड वर बोलावून घेऊन पायाला ट्रेचिंग करण्याच्या बहाण्याने पीडितेच्या पायांना, मांड्यांना हात लावू लागला. त्यावेळेस फिर्यादीने आरोपी जावेद शेख यास प्रतिकार केला. त्यावेळी त्याने 'मी तुझा प्रशिक्षक आहे, मला हात लावावाच लागतो', असे म्हणत समजूत काढली.

### ■ हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

**या प्रकारामुळे श्रीगोंदा शहरातील हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत त्यांनी आज एकत्र येऊन श्रीगोंदा पोलिसांना निवेदन देऊन आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली असून आरोपी अटक न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा दिला. तसेच या आरोपीने अश्या प्रकारे अजून काही तरुणीवर अत्याचार केला असल्यास न घाबरता समोर येण्याचे आवाहन या पदाधिकाऱ्यांनी केले. तसेच या आरोपीला वाचवण्यासाठी सत्तेत सहभागी असलेल्या एका हिंदुत्ववादी विचारसरणीच्या पक्षाचा पदाधिकारी हस्तक्षेप करत असल्याचा आरोप करत या बाबत संताप व्यक्त केला.**

### ■ अनेक मुलीचे लैंगिक शोषण?

**श्रीगोंद्यातील रनर्स क्लब या पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमीचालक जावेद शेख याच्याकडून अकँडमीमधील अजूनही ५ ते ७ मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची चर्चा ऐकण्यास मिळत होती. मात्र मुली सामाजिक भीती, बदनामी होईल यामुळे समोर येत नसल्याचे बोलले जात आहे.**

नंतर तिच्याशी जवळीक साधून तिच्यावर तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आणि याबाबत कोणालाही काही एक सांगितले तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर त्याने वेळोवेळी पीडितेच्या इच्छेविरुद्ध ग्राऊंडवर व त्याच्या राहत्या (जकाते वस्ती) घरी नेऊन अनेक वेळा शारीरिक संबंध ठेवले त्यातून जानेवारी २०२५ मध्ये फिर्यादीच्या पोटात अचानक दुखू लागल्यानंतर ती उपचारकामी श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात गेली असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ती गर्भवती असल्याचे सांगितले.

त्यावेळी तिने फोन करून आरोपी जावेद शेख यास गर्भवती असल्याचे सांगितले. त्यावेळी जावेद व त्याचा अज्ञात (नाव माहित नाही )मित्र हे तिच्या रूमवर गर्भपाताच्या गोळ्या घेऊन गेले आणि पीडितेला जबरदस्तीने दिल्या त्याने तिचा गर्भपात झाला. **(पान ४ वर)**









## संपादकीय

### सोशल मीडियाचा बालमानसिकतेवरभयावह परिणाम

४ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे २ वाजता गाझियाबादच्या भारत सिटी सोसायटीतील बी-१ टॉवरच्या ९व्या मजल्यावरून तीन बहिणींनी उडी मारली. निशिका (१६), प्राची (१४) आणि पाखी (१२) या तीनही मुली जागीच मृत्यू पावल्या. सुरुवातीला कोरियन 'लव्ह गेम'चा शेवटचा टास्क पूर्ण करण्यासाठी ही आत्महत्या असल्याचे वृत्त आले, पण पोलिसांच्या प्राथमिक तपासात आणि डायरीतील नोंदींमधून उघड झाले की, ही घटना कोणत्या एका 'डेडली गेम'मुळे नव्हती, तर दीर्घकाळच्या सोशल मीडियावरील व्यसन, कोरियन संस्कृतीचा अतिरेकी ओढा, कुटुंबातील तणाव आणि मोबाईल काढून घेतल्याने उद्धवलेल्या भावनिक संकटामुळे घडली.

डायरीत आठ पानांच्या नोटमध्ये मुलींनी लिहिले: आम्ही कोरियन आहोत, तुम्ही इंडियन... आम्हाला कोरियन अभिनेते आणि के-पॉप ग्रुप्सना कुटुंबापेक्षा जास्त प्रेम आहे... कोरिया आमचे जीवन आहे... मृत्यू तुमच्या मारहाणीपेक्षा चांगला आहे... सॉरी पापा. त्यांनी स्वतःची नावे बदलली होती, यूट्यूब चॅनेल सुरू केले होते, कोरियन भाषा शिकली होती आणि घरीही कोरियन बोलत होत्या. कोविडनंतर शाळा सोडली, अभ्यास सोडला, जगापासून अलग झाल्या. वडील चेतन कुमार (फॉरेक्स ट्रेडर) यांनी मोबाईल काढून घेतले, विकलेही, कारण आर्थिक अडचणी होत्या. त्याच रात्री मुलींनी आईला चुंबन घेतले, मी तुझ्यावर प्रेम करते म्हटले आणि बाल्कनीतून उडी मारली.

ही घटना एकटी नाही. गेल्या काही वर्षांत सोशल मीडियावरील व्यसन आणि ऑनलाइन गेमिंगमुळे अनेक बाल-किशोर आत्महत्या झाल्या आहेत. २०१४ मध्ये पुण्यात अशीच धक्कादायक घटना घडली. १५ वर्षीय मुलाने १४व्या मजल्यावरून उडी मारली. नोटमध्ये फक्त लॉग आऊट लिहिले होते. तो दिवस-रात्र गेमिंग करत होता.

सप्टेंबर २०२५ महिन्यात लखनौमधील ६वीचा मुलाने फ्री फायर मध्ये १३ लाख रुपये गमावले. वडिलांना सांगितल्यावर काही तासांत आत्महत्या केली.

भोपाळ मध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये १४ वर्षीय मुलाने गेमिंग व्यसनातून आत्महत्या केली. कुटुंबाच्या खात्यातून त्याने पैसे उडवले होते.

ऑगस्ट २०२५ मध्ये तेलंगणा येथील दहावीच्या मुलाने पब्जी गेमच्या व्यसनामुळे फोन काढून घेतल्यावर आत्महत्या केली. तो दिवसात १० तास खेळत होता.

ब्ल्यू व्हेल, मोमो चॅलेंज, पब्जी, फ्री फायर – हे सारे 'टास्क-बेस्ड' किंवा व्यसनकारक प्लॅटफॉर्म मुलांच्या मेंदूत डोपामाइनचा अतिरेक करतात. वास्तव आणि आभासी जगाचा फरक मिटतो. ओळख हरवते. भारतीय असण्याचा अभिमान राहत नाही. कुटुंब 'समजणारे' वाटत नाही. शाळा, खेळ, मित्र – सर्व गमावले जाते.

इकॉनॉमिक सर्व्हे २०२५-२६ नुसार भारतीय २०२४ मध्ये फोनवर जवळपास एक लाख कोटी तास घालवले. २०२४ आसरच्या अहवालनुसार फक्त ५७% किशोर शिक्षणासाठी फोन वापरतात, ७६% सोशल मीडियासाठी. डब्ल्यूएचओने 'इंटरनेट गेमिंग डिसऑर्डर'ला मानसिक आजार मानले आहे.

या व्यसनाचे परिणाम फक्त आत्महत्या नव्हे. डिप्रेशन, चिंता, एकटेपणा, शारीरिक आजार, अभ्यासातील घसरगुंडी, कुटुंबीयांशी संबंध तुटणे – सर्व होत आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबात हे आणखी घातक ठरते, कारण पालकांना वेळ नाही, सल्ला नाही.

ही पिढी वाचवायची असेल तर तातडीने पावले उचलायला हवीत. पालकांनी स्क्रीन टाइम मर्यादित करा (दिवसात १-२ तास). मुक्त संवाद ठेवा. मुलांच्या भावना ऐका. ऑफलाइन खेळ, पुस्तके, कुटुंबीय वेळ, खेळ यांना प्रोत्साहन द्या. डिजिटल लिटरसी शिकवा – काय खरे, काय फेक ते ओळखायला शिकवा.शाळांमध्ये मानसोपचार तज्ज्ञ, जागरूकता सत्रे अनिवार्य करा. सरकारने टास्क-बेस्ड गेम्स, अप्रौढ सामग्रीवर कडक नियंत्रण ठेवावे. पालकांसाठी ॲप्स, हेल्पलाइन (जसे १०९८ चाइल्ड हेल्पलाइन) अधिक प्रभावी कराव्यात. सोशल मीडिया कंपन्यांना जबाबदार धरावे.

ोशल मीडिया हे साधन आहे, व्यसन नाही. गाझियाबादच्या तीन बहिणींनी दिलेला संदेश स्पष्ट आहे: आम्हाला समजलं असतं तर... आता आपण समजूया. वेळीच लक्ष दिले नाही तर उद्या ही पिढी पूर्णपणे बदलून जाईल – ज्यात ना ओळख, ना कुटुंब, ना देशप्रेम राहील.पालक, शिक्षक, सरकार – सर्वांनी एकत्र येऊया. नव्या पिढीला वास्तव जगण्याची संधी देऊया, आभासी जगात हरवू नये.

# शिर्डी परिक्रमेत डीजेला बंदी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिर्डी साई मंदिरात परिक्रमेदरम्यान डीजे तसेच फिरत्या साऊंड सिस्टीमवर कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. केवळ निश्चित ठिकाणी, स्थिर स्वरूपात भजन व पारंपरिक वाद्यवृंद वादनासच परवानगी देण्यात यावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

आगामी १३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या शिर्डी साई परिक्रमेदरम्यान भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी काटेकोर नियोजन करावे. भाविकांच्या सुरक्षिततेसह आरोग्य व स्वच्छतेला सर्वो च्च प्राधान्य देत परिक्रमा मार्गावर आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिल्या. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी परिक्रमेदरम्यान डीजे व फिरत्या साऊंड सिस्टीमवर कडक निर्बंध असून केवळ निश्चित ठिकाणी स्थिर स्वरूपात भजन व पारंपरिक वाद्य वादनास परवानगी द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

शिर्डी परिक्रमा नियोजनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, नगराध्यक्षा जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय महसूल अधिकारी माणिक आहेर, किरण सावंत पाटील, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, तहसीलदार अमोल मोरे, साई संस्थान प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, गटविकास अधिकारी विवेक गुंड यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

कोळेकर म्हणाले, परिक्रमा मार्गावर अन्नदान करणाऱ्या स्टॉलधारकांनी कचरा व्यवस्थापनाचे काटेकोर पालन करावे. नगरपालिकेने परिक्रमा मार्गावरील रस्ते, स्वच्छता व पथदिव्यांची दुरुस्ती वेगाने पूर्ण करावी, महावितरणने भाविकांच्या सुरक्षिततेसाठी लोंबकळणाऱ्या विद्युत तारांची उंची वाढवावी, अंधार असलेल्या भागात हॅलोजन दिवे लावावेत. ावकांच्या आरोग्यासाठी परिक्रमा मार्गावर १० रुग्णवाहिका, फिरती वैद्यकीय पथके व ओआरएस केंद्रे तैनात ठेवावीत. महिला भाविकांची कुचंबणा होऊ नये यासाठी मार्गावर ठिकठिकाणी फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी व ती राखीव ठेवावीत. १२ तारखेला वाहतूक बंदी लागू होण्यापूर्वीच पाण्याचे टँकर व पुरेसा पाणीसाठा उपलब्ध करून द्यावा. साकोरी शिवारातील वीटभट्ट्या व स्टोन क्रशरमुळे होणारी धूळ व चिखल टाळण्यासाठी संबंधित व्यावसायिकांनी परिक्रमेच्या दोन-तीन दिवस आधी कामकाज व वाहतूक बंद ठेवावी. तसेच परिक्रमा मार्गक्रमण झाल्यानंतर त्वरित साफसफाई करण्यासाठी विशेष पथके व घंटागाड्यांची सोय करावी. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नगर-मनमाड महामार्गावरील वाहतूक पर्यायी रिंग रोडने वळविण्याचे नियोजन करावे. भाविकांच्या वाहनांसाठी संस्थानच्या व खासगी मोकळ्या जागांवर विनामूल्य पार्किंग उपलब्ध करून दिशादर्शक फलक लावावेत.रस्त्याच्या कडेला असलेल्या रक्षक दगडांवर रिफ्लेक्टर बसवावेत. पोलीस प्रशासनाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करावी व राज्य उत्पादन शुल्क विभागाने १२ तारखेला मद्यविक्री बंद (ड्राय डे) पाळण्याबाबत दक्षता घ्यावी, असेही कोळेकर यांनी सांगितले.''गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी खंडोबा मंदिर परिसरात मोठी एलईडी स्क्रीन उभारावी व आरतीनंतर सकाळी ५:४० वाजता रथाचे प्रस्थान होईल याचे नियोजन करावे. कृषी विभागाने शासकीय योजनांचे प्रसिद्धी फलक सुरक्षितरीत्या लावावेत''.- गोरक्ष गाडीलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान शिर्डी

## अजित पवार यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी : डॉ. सुजय विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** माजी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष स्व. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.मात्र ही पोकळी उपमुख्य मंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटना आणि कार्यकर्ते निश्चितच भरून काढतील, असा विश्वास पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

> स्व अजित पवार यांची प्रशासनावर पकड होती, हे सर्वश्रुत आहे. कित्येक वर्षे त्यांनी राज्याचे वित्तमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. उप मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक काळ काम करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. ज्या दिवशी त्यांची दुर्घटना घडली, त्या घटनेवर माझा विश्वासच बसत नव्हता. एवढा धडाडीचा, प्रत्येकाच्या विषयी तळमळ असलेला विकासपुरुष आपल्यातून निघून जाईल, असे कधीही वाटले नव्हते,
>
> **अमोल खताळ**
> **आमदार संगमनेर विधानसभा**

> राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासारख्या नेत्याच्या जाण्याने महाराष्ट्राचे अपरिमित असे नुकसान झाले आहे. त्यांच्या पश्चात ही उणीव अधिक तीव्रतेने राज्याला जाणवू लागली आहे, ही खंत माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात कायम आहे. मात्र नियतीपुढे आपले काहीच चालत नाही, हेच अंतिम सत्य आहे.
>
> **सत्यजित तांबे**
> **आमदार**
> **नाशिक पदवीधर मतदार संघ**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष स्व. अजित पवार यांच्या अकाली निधनानिमित्त संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. विखे पा म्हणाले की, राजकारणात फार कमी नेते असे असतात की ज्यांचा स्वभाव समाज स्वीकारतो. स्व. अजित पवार हे त्यापैकी एक होते. ते कधी कडक, कधी प्रेमळ, तर कधी स्पष्ट शब्दांत बोलत असत. आजच्या नव्या पिढीने राजकारणात येण्यापूर्वी आपल्या कुटुंबाकडे, व्यवसायाकडे आणि आर्थिक स्थैर्याकडे लक्ष द्यावे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेली व्यक्तीच समाजाचा खऱ्या अर्थाने विकास करू शकते, हे तत्व स्व. अजित पवार यांनी महाराष्ट्राला शिकवले. आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकप्रतिनिधी कधीही विकास कामांमध्ये टक्केवारी खाणार नाही, त्यामुळेच खरा विकास शक्य होतो, असेही त्यांनी नमूद केले. स्पष्ट वक्तेपणा, लोकांना सत्य सांगण्याची हिंमत आणि कोणत्याही प्रकारे लोकांना भ्रमात न ठेवण्याची नवी राजकीय संस्कृती स्व. अजित पवार यांनी संपूर्ण महाराष्ट्राला दिली, असल्याचे डॉ विखे यांनी सांगितले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप शिंदे, जिल्हाध्यक्ष कपिल पवार, तालुकाध्यक्ष आणि उद्योजक आबासाहेब थोरात, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत, तालुकाध्यक्ष प्रवीण कानवडे, उद्योजक राजेश मालपाणी, ज्येष्ठ नेते वसंत देशमुख साथी माळवे ॲड. नईम इनामदार, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष रामभाऊ राहाणे, शहराध्यक्ष विनोद सूर्यवंशी, आर पी आयचे शहराध्यक्ष कैलास कासार, भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, उपाध्यक्ष संदीप देशमुख, सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ, शहराध्यक्ष पायल ताजणे, नगराध्यक्ष मैथली तांबे, शिवसेना उबाटा गटाचे जिल्हा उपाध्यक्ष अमर कतारी, राजन शिंदे, अजय फटांगरे, गौरव डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आदरांजलीपर भाषणे केली.

## गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालयात विद्यार्थी सहभाग परिसंवाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** गुणवत्ता सुधार योजना, नियोजन आणि विकास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण संस्थेचे गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय संयुक्त विद्यमान विद्यार्थी सहभाग परिसंवादचे आयोजन करण्यात आले.

या परीसंवादासाठी परीक्षक म्हणून गोदागिरी फार्मचे संचालक ऋषीकेश औताडे,संगमनेर येथील प्रा. कोमल म्हस्के, संगमनेर यांनी केले. १०२ विध्यार्थिनींनी माझ्या करियरची ब्लूप्रिंट या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये कु. पूर्वा पाठक नेतृत्व करीत असलेल्या एस वाय बी. एससी(होम सायन्स)चा प्रथम क्रमांक, महिमा थोरात नेतृत्व करत असलेल्या एस वाय बीसीएचा द्वितीय क्रमांक तर अंजली थेटे नेतृत्व करत असलेल्या टीवायबीसीएला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. अनुक्रमे तीन हजार,दोन हजार, एक हजार असे रोख स्वरूपात बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ अनुश्री खैरे यांनी केले. आभार प्रदर्शन समन्वयक डॉ कांचन देशमुख यांनी केले.कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रा. प्रियांका तांबटकर यांनी केले.




# श्रमसंस्कार शिबिरातून ग्रामीण विकासाला नवी चालना : ज्ञानदेव चोळके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) ही केवळ एक सामाजिक उपक्रम नसून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांची जाणीव करून देणारे प्रभावी व्यासपीठ आहे. रासेयोच्या शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी दृढ होते आणि 'आहे रे'-'नाही रे' या वर्गांतील दरी कमी करण्यासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळते. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळून युवकांमध्ये राष्ट्रसेवेची भावना जागृत होते, असे प्रतिपादन ज्ञानदेव पाटील चोळके यांनी केले.

चोळकेवाडी येथे शिर्डी साई रुरल इन्स्टिट्यूटचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहाता आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिर्डी साई रुरल इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. प्रदीप दिघे होते.यावेळी सरपंच पवन आरंगळे, ग्रामसेविका रुक्मिणी सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. सत्यजित पोतदार, मुख्याध्यापक बाळासाहेब मते, ग्रामपंचायत सदस्य दिपालीताई चोळके, कार्यक्रमाधिकारी प्रा. चंद्रकांत बनसोडे, डॉ. सुरेश पुलाटे, प्रा. पुनम तांबे, प्रा. सुहास शिंदे, प्रा. अमोल नेहे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी चोळके म्हणाले, युवकांनी समाजकार्याशी सक्रियपणे जोडले जावे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण विकासात प्रभावी योगदान द्यावे, असे आवाहन केले. महात्मा गांधी व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी सेवाभाव, त्याग आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. दिघे यांनी पाणलोट क्षेत्र विकास व पडीक जमीन व्यवस्थापन या विषयाचे महत्त्व अधोरेखित केले. स्वयंसेवकांनी आपल्या उज्ज्वल भविष्याच्या वाटचालीत समाज आणि राष्ट्राचे देणे लागते, ही जाणीव कायम ठेवावी. फुल ना फुलाची पाकळी या भावनेतून जरी सेवा केली तरी ती समाजासाठी अत्यंत मोलाची ठरते. राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकी रुजवणे हे असून, त्यासाठी प्रत्यक्ष कृतीतून काम करणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# जबरी चोरीतील आरोपी जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील कानडगाव येथे घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

फिर्यादी बापू दत्तात्रय जामदार (रा. कुंभारआळी, ता. शिरूर, जि. पुणे) हे विटभट्टीसाठी मजूर आणण्याच्या उद्देशाने बोलेरो गाडी (क्र. एम.एच. १४ एच.यू. ८७७४) घेऊन राहुरी तालुक्यात आले होते. कोल्हार येथे असताना संजय सुरवसे व त्याच्या साथीदारांनी मजूर दाखवण्याच्या बहाण्याने त्यांना कानडगाव येथील जंगलात नेले. तेथे फिर्यादीकडील ४,९०० रुपये रोख, मोबाईल हिसकावून फोन-पेद्वारे ५० हजार रुपये ट्रान्सफर करून बोलेरो गाडी घेऊन आरोपी पसार झाले. ही घटना ३१ जानेवारी रोजी घडली होती.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करून तपास सुरू करण्यात आला. गुप्त बातमीदाराच्या माहितीनुसार नेवासा फाटा येथे छापा टाकून आरोपी रमेश उर्फ संजय उर्फ संजु साहेबराव सुरवसे (वय ३८), राहुल रोहिदास मोरे (वय २१, रा. सोनगाव, ता. राहुरी) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली असून दोन आरोपी फरार आहेत.

ताब्यातील आरोपींना पुढील तपासासाठी राहुरी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्या बेलापूर येथे ६ कोटींच्या कामांचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** बेलापूर बुश्रश्रग्रामपंचायतीच्या वतीने उद्या शनिवार (दि.७) रोजी सायं. ४.३० वा. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे हस्ते ६ कोटी १२ लक्ष खर्चाच्या विविध कामांसह रो-हाऊसिंग पध्दतीच्या घरकुल जागेचे वाटप करण्याचा कार्यक्रम जि.प. सदस्य शरद नवले यांचे अध्यक्षतेखाली व बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, भाजपा सरचिटणीस प्रफुल्ल डावरे यांचे उपस्थीतीत संपन्न होणार आहे. अशी माहिती सरपंच मिनाताई साळवी व उपसरपंच चंद्रकांत नवले यांनी दिली.

ब े ल ा प ू र बुश्रश्रग्रामपंचायतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळासह चौक सुशोभिकरण यासह विविध विकास कामांच्या शुभारंभासह घरकुलांचे जागा वाटप कार्यक्रम आझाद मैदान येथे संपन्न होणार आहे.

याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जि.परिषदेचे मुख्य कार्यकारी



अधिकारी आनंद भंडारी, प्रांताधिकारी किरण सावंत पाटील,तहसिलदार मिलिंदकुमार वाघ,भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर,जि.परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेन्द्र देसले,पं.समितीचे माजी सभापती दीपक पटारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे किरण साळवे,भाजपचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे,सार्वजनिक बांधकाम (संगमनेर विभाग) श्रीनिवास वर्पे,भाजप शहराध्यक्ष जितेन्द्र छाजेड, जि.परिषद कार्यकारी अभियंता बाळासाहेब नरवडे, भाजपच्या महिलाध्यक्ष डॉ. स्वाती चव्हाण, गटविकास अधिकारी विवेक गुंड आदी उपस्थित राहणार आहेत.

सदर प्रसंगी ग्रामस्थ तसेच घरकुल लाभार्थी व हितचिंतकांनी उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच मिनाताई साळवी,उपसरपंच चंद्रकांत नवले ग्रामपंचायत सदस्य स्वाती अमोलिक, मुश्ताक शेख,तबस्सुम बागवान, प्रियंका कुऱ्हे , उज्वला कुताळ, वैभव कुऱ्हे, सुशीलाबाई पवार,ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांचेसह सदस्यांनी केले आहे.

# साईज्योती प्रदर्शनावर वादळ

## मोजक्यांनाच लाभ' देण्याचा आरोप : अधिकाऱ्यांचे साटेलोटे की नियोजनातील घोळ?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पाच फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या साईज्योती सरस २०२६ या भव्य प्रदर्शनाबाबत जिल्हाभरात सध्या जोरदार चर्चा सुरू झाली आहे. जिल्हा परिषद, अहिल्यानगर व उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनाच्या नियोजनात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांनी मोजक्या लोकांना हाताशी धरून कार्यक्रम पुढे नेल्याचा गंभीर आरोप होत आहे. या प्रकारामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्येच नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, त्याची चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात सुरू आहे.

महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थ व विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमातून महिलांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात प्रदर्शनाच्या नियोजनातच दुजाभाव झाल्याचे आरोप पुढे येत आहेत. साईज्योतीसारख्या महत्त्वाच्या उपक्रमाचा लाभ सर्व बचत गटांना मिळायला हवा असताना, तो मोजक्याच गटांपुरता मर्यादित ठेवण्यात आल्याचा आरोप बचत गट सदस्यांनी केला आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकडून बचत गटांना स्टॉलचे वाटप करण्यात आले आहे. मात्र या स्टॉलसाठी मोठ्या प्रमाणावर मागणी असतानाही नेहमीप्रमाणे तेच तेच गट पुढे येत आहे. अनेक पात्र बचत गटांनी मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याची तक्रार होत आहे. काहींनी ही बाब कार्यालयातील वरिष्ठ व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असतानाही त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याची चर्चा आहे.

या पार्श्वभूमीवर 'स्टॉल वाटपात पारदर्शकता आहे का?' असा सवाल उपस्थित होत असून, यामागे काही अधिकाऱ्यांचे खास हितसंबंध तर नाहीत ना, अशी शंका व्यक्त केली जात आहे.या प्रदर्शनासाठी निमंत्रणे देतानाही भेदभाव झाल्याचा आरोप अधिक ठळकपणे समोर आला आहे. जे आमच्या संपर्कात आहेत, त्यांनाच निमंत्रण असा अलिखित नियमच काही अधिकाऱ्यांनी केल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या वर्तुळात सुरू आहे. शहरातील प्रतिष्ठांनाही त्यांनी त्याच पध्दतीने निमंत्रण दिलेले आहे.

मोजक्याच लोकांना निमंत्रण दिल्याने या संपूर्ण कार्यक्रमामागे काही तरी गौडबंगाल असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. जर कार्यक्रम सर्वांसाठी असेल, तर निमंत्रण वाटपात गुप्तता का, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. निमंत्रण व पत्रिका वाटपाची जबाबदारी नेमकी कोणाकडे होती, स्टॉल वाटपाचे निकष काय होते आणि त्याचे पालन झाले की नाही, याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. उमेदसारख्या महत्त्वाच्या अभियानाच्या नावाखाली जर मोजक्यांनाच लाभ दिला जात असेल, तर हा प्रकार गंभीर असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी बचत गट सदस्यांसह जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकडून होत आहे.कार्यक्रमाची माहिती मागून देण्यास टाळाटाळ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांकडे काहींनी साईज्योती प्रदर्शनातील कार्यक्रम काय याची माहिती मागविली होती. हा कार्यक्रम नेमका कसा होणार, कोण सहभागी असणार, स्टॉल वाटपाचे निकष काय, याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. ही बाबही संशयास्पद ठरत असून, माहिती लपवण्यामागे नेमका उद्देश काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## शेतीच्या वादातून एकावर कुऱ्हाडीने हल्ला; पाच जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शेतात चारा आणण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला जुन्या वादातून पाच जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून कुऱ्हाडीने जखमी केल्याची खळबळ जनक घटना तमनर आखाडा शिवारात घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तमनर आखाडा येथील रहिवासी कैलास उर्फ कल्याण अण्णासाहेब तमनर (वय ४०) हे ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:३० च्या सुमारास आपल्या शेती गट क्र. १६९ मध्ये जनावरांसाठी चारा आणायला गेले होते. यावेळी झाडे तोडल्याचा आवाज आल्याने ते तिथे गेले असता, आरोपींनी त्यांना अडवून वाद घातला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तर एका आरोपीने कुऱ्हाडीने वार करून त्यांच्या उजव्या हातावर गंभीर इजा केली. याप्रकरणी पोलिसांनी बबई भिमाजी तमनर, सविता रामदास तमनर, भिमाजी तबाजी तमनर, भानुदास भिमाजी तमनर आणि रामदास भिमाजी तमनर अशा पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार अर्जुन दारकुंडे हे करत आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### वृद्धाला लाकडी दांडक्याने मारहाण; चौघांवर गुन्हा

**राहुरी** : तालुक्यातील तमनर आखाडा येथे शेतात सरपण काढण्यासाठी गेलेल्या ८५ वर्षीय वृद्ध शेतकरी चिमाजी तबाजी तमनर यांना जुन्या वादातून बेदम मारहाण करण्यात आली. आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी कैलास तमनर, विलास तमनर, जिजाबाई तमनर आणि मंदाबाई तमनर यांच्या विरुद्ध इछड कलम ११८(१), ११५(२), ३५१(२) व ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अर्जुन दारकुंडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### प्रवरेच्या माध्यमातुन शेतकरी चर्चासत्र



**राहाता** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थे अंतर्गत असणार्या लोणी येथील कृषी महाविद्यालयाने पिंपळस तालुका राहाता येथे द्राक्ष बागेतील किड आणि रोग व्यवस्थापन या विषयावर शेतकरी चर्चासत्र आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून बायरचे तंत्र अधिकारी शुभम कडलग, तसेच माजी सरपंच नितीन कापसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रामध्ये प्रगतशील शेतकरी शंकर कुदळे, भाऊसाहेब निधाने, गोविंद खापटे, ज्ञानेश्वर कुदळे, अनिल लोखंडे, ईश्वर आगरे, विजय निरगुडे, भारत निधाने, तान्हाजी चुळभरे, अमोल कुदळे, दिलीप कुदळे,पोपट कुदळे, मच्छिंद्र बनकर, कुणाल वाघमारे,आण्णासाहेब कुदळे,अजित मोरे, राजेंद्र कुदळे,सागर कापसे आदी शेतकरी उपस्थित होते.

### तांदूळवाडी ग्रामसभेत अजितदादांना श्रद्धांजली



**राहुरी** : तालुक्यातील तांदुळवाडी येथे झालेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत विशेष ग्रामसभा ग्रामपंचायत कार्यालयासमोर सरपंच विराज धसाळ यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या विशेष ग्रामसभेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सरपंच विराज धसाळ म्हणाले, स्व. अजितदादांचे अहिल्यानगर जिल्ह्यात नेहमी येणे-जाणे होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या ग्रामिण भागात मोठी शोककळा पसरली असून स्पष्ट बोलणे, प्रशासनावर पकड असल्याबरोबर कठोर निर्णय घेण्याची क्षमता असलेले नेतृत्व आज आपल्यात नसल्याच्या यातना होत आहे. तसेच ग्रामसभेत ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना सरपंच विराज धसाळ व ग्रामविकास अधिकारी संजय भिंगारदे यांनी सविस्तर उत्तरे दिली. यावेळी माजी सरपंच गणपत पेरणे, सुर्यभान म्हसे, इंद्रभान पेरणे, उपसरपंच ज्ञानेश्वर खिलारे, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाळासाहेब रावसाहेब पेरणे, भास्कर पेरणे, शरद पेरणे, सेवा संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पेरणे, पत्रकार निसारभाई सय्यद, कृषि सहाय्यक बाळासाहेब सुळ आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अपघातात गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू !



**राहुरी** : येथील कृषी विद्यापीठाजवळ २ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या वेळी झालेल्या एका भीषण रस्ता अपघातात गंभीर जखमी झालेल्या ५० वर्षीय महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. सुमन सुभाष पोपळघट, रा. सावळी विहीर, ता. राहता, असे मृत महिलेचे नाव आहे. सुमन पोपळघट ह्या दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११.३० वाजे दरम्यान राहुरी कृषी विद्यापीठा जवळून जात असताना त्यांचा अपघात झाला होता. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र रुग्णालयात उपचार सुरू असताना त्या मयत झाल्या. या प्रकरणी रुग्णालयातून प्राप्त झालेल्या अहवालानुसार राहुरी पोलिस ठाण्यात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विकास वैराळ हे करत आहे.

# 'गोड बोलणाऱ्यांना घरात बसवा'

## अजित पवारांच्या शैलीत सुजय विखेंचा हल्ला



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : राहुरीत नगर मनमाड राज्य महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत आयोजित बैठकीत माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी अत्यंत स्पष्ट आणि रोखठोक भूमिका घेतली. आम्ही कधीही पदाचा अहंकार बाळगलेला नाही. जनतेसाठी काम करताना सरळ आणि प्रामाणिक भूमिका घेतो, असे सांगत त्यांनी प्रशासन, ठेकेदार आणि नागरिकांनाही जबाबदारीची जाणीव करून दिली. काम करताना गोड बोलण्यापेक्षा थेट आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

**नगर मनमाड महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात**

राहुरी शहरातून जाणाऱ्या नगर मनमाड महामार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर असून २० फेब्रुवारीपर्यंत ते पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या कालावधीत नागरिकांनी आणि प्रवाशांनी संयम व सहकार्य ठेवावे, असे आवाहन करण्यात आले. महामार्गालगतच्या बंदिस्त साईड गटारापासून चार मीटरपर्यंत असलेली अतिक्रमणे संबंधित व्यापारी व नागरिकांनी स्वतःहून हटवावीत, अन्यथा प्रशासनामार्फत कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला.

**व्यापाऱ्यांच्या तक्रारींवर थेट चर्चा**

सध्या राहुरी शहर हद्दीत साईड गटाराचे काम सुरू असून गटारी रस्त्याच्या पातळीपेक्षा उंच झाल्याने व्यवसायावर परिणाम होत असल्याच्या तक्रारी व्यापाऱ्यांकडून मांडण्यात आल्या होत्या. या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी ज्ञानेश्वर चित्र मंदिर येथे बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीदरम्यान नागरिक व व्यापाऱ्यांनी आपापल्या अडचणी मोकळेपणाने मांडल्या.

**थोडा त्रास सहन करा, प्रश्न कायमचा सुटेल**

काम पूर्ण होईपर्यंत काही काळ गैरसोय होईल, मात्र त्यानंतर नगर-मनमाड महामार्गाचा प्रश्न कायमचा सुटेल, असा विश्वास डॉ. विखे यांनी व्यक्त केला. अतिक्रमणे काढून घेण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करत त्यांनी विकासकामांना अडथळे निर्माण होऊ नयेत, यावर भर दिला.

**समस्या ऐकून थेट आदेश**

बैठकीत उपस्थित नागरिकांनी पाणी निचरा, रस्त्याची उंची, दुकानांपर्यंत पोहोच आणि वाहतुकीसंबंधी विविध प्रश्न उपस्थित केले. या प्रत्येक समस्येची गंभीर दखल घेत डॉ. सुजय विखे यांनी ठेकेदार व प्रशासनाला जागेवरच स्पष्ट आदेश दिले. गैरसमज दूर करत कामाला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**समस्या सोडवणे हाच उद्देश**

अनेक तांत्रिक अडचणी असूनही हे काम सुरू आहे. सध्या आंदोलन किंवा वाद न करता सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करणे अत्यावश्यक आहे. श्रेय कुणीही घ्यावे, मात्र काम वेळेत पूर्ण होणे महत्त्वाचे आहे. पुढील एका महिन्यात शहरातील काम पूर्ण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

**मी पदाचा नव्हे, कामाचा माणूस आहे**

मी माजी खासदार असलो तरी अनावश्यक गोंधळ निर्माण करू नका. रखडलेली व वाढीव रस्त्यांची कामे वरिष्ठ पातळीवरून मंजूर करून आणण्याची जबाबदारी मी घेतो. ठेकेदाराला अडथळे आले तर काम थांबेल, आणि त्याची किंमत आपल्यालाच मोजावी लागेल. भविष्यातील पिढीने आपल्याला दोष देऊ नये, यासाठी हे काम पूर्ण होऊ द्या, असा स्पष्ट संदेशही त्यांनी दिला.

**अजित पवार यांच्या निर्णयक्षम नेतृत्वाची आठवण**

नगर मनमाड महामार्गावरील दीर्घकाळापासून प्रलंबित व नागरिकांना त्रासदायक ठरलेल्या समस्यांवर आयोजित बैठकीत डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्येक प्रश्नावर ठाम भूमिका घेतली. कोणतीही तडजोड न करता त्यांनी वेळेत काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळे अनेकांना स्वर्गीय अजित पवार यांच्या निर्णयक्षम बैठकीची आठवण झाली.

## रस्त्याच्या साईड गटार कामाचा शासनाने पुनर्विचार करावा : प्राजक्त तनपुरे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथे नगर मनमाड राष्ट्रीय महामार्गालगत सुरू असलेल्या साईड गटारीच्या कामकाजाची पाहणी करत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी नाराजी व्यक्त केली. माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी राहाता परिसरातील गटार बांधकामाला ज्याप्रमाणे स्थगिती आणुन व्यापार्यांच्या हिताचा निर्णय घेतला. त्याचपद्धतीने राहुरी परिसरातील व्यापार्यांच्या हितार्थ निर्णय घेऊन साईड गटार कामाबाबत पुनर्विचार करावा अशी मागणी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केली. राहुरी येथे नगर मनमाड रत्याची पाहणी करत असताना माजी मंत्री तनपुरे म्हणाले की, अनेकांचा जीव नगर मनमाड रस्त्याने घेतला. गेल्या दोन वर्षांपासून रस्ता पुर्णपणे खराब झाल्याने राहुरीकरांना मोठा त्रास सहन करावा लागला. परंतू राहुरीत कसाबसा एका बाजुने का होईना रस्त्यावर डांबर पडल्याने काहीशी वाहतूक सुरळीत झालेली आहे. दरम्यान, रस्त्याच्या बाजुने साईड गटार कामाची अधिक उंची व कामाचा कमकुवतपणा पाहता रस्ता ओलांडणे मुश्किल होणार आहे. साईड गटार होत असताना रस्त्याची रुंदीही घटली आहे. सदरची बाब राहुरीकरांना पुन्हा त्रासदायक ठरणारी आहे. त्यामुळे सत्ताधारी असलेले माजी खासदार विखे यांनी ज्या पद्धतीने पुढाकार घेत राहाता परिसरात दुरुस्ती सुचवली आहे. त्याचपद्धतीने राहुरीतही साईड गटार कामामध्ये बदल केला पाहिजे. तसेच राहुरीत वाहतुकीची होणारी अधिक कोंडी पाहता शहरामध्ये उड्डाणपूल महत्वाचा ठरणारा आहे. त्यामुळे माजी खासदार डॉ. विखे यांनी सत्तेच्या माध्यमातून नगर मनमाड रस्त्याबाबत दखल घेऊन राहुरी परिसरातील वाहतूक कोंडी पूर्णपणे थांबावी व साईड गटारच्या कामामुळे रस्त्याची अडचण वाढू नये यासाठी प्रयत्न करावे असे विनम्र आवाहन प्राजक्त तनपुरे यांनी केले आहे.

## अजितदादांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी : थोरात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : स्वर्गीय विलासराव देशमुख, आर. आर. पाटील, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर अत्यंत अकस्मातपणे अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक उमदे, कणखर नेतृत्व गमावले आहे. सहकार, शिक्षण व प्रशासन या क्षेत्रांची सखोल जाण असलेले अजितदादा रोखठोक स्वभावामुळे जनतेच्या हृदयात स्थान मिळवून गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे, अशी भावना माजी महसूल मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली.

मालपाणी लॉन्स येथे आयोजित सर्वपक्षीय शोकसभेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, माजी खासदार डॉ. सुजय विखे, उद्योगपती राजेश मालपाणी, नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. थोरात म्हणाले, १९९२ पासून अजितदादा पवार यांच्यासोबत विधिमंडळ व मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळाली.

कठोर निर्णय घेण्याची त्यांची क्षमता राज्याच्या हितासाठीच होती. चांगल्या कामाचे कौतुक करण्याची त्यांची सवय प्रेरणादायी होती. यावेळी डॉ. सुधीर तांबे, सत्यजित तांबे व डॉ. सुजय विखे यांनीही अजितदादांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीपराव शिंदे यांनी तर आभार कपिल पवार व आबासाहेब थोरात यांनी मानले.

## ज्ञानोदय स्कूलमधील सीसीटीव्ही कॅमेरे उपक्रमाचे उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित ज्ञानोदय इंग्लिश स्कूलमध्ये सर्व वर्ग खोल्यांसह शालेय परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले या उपक्रमाचे उदघाटन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.सीसीटीव्ही कॅमेरे हे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केले. ज्ञानोदय इंग्लिश स्कूल मध्ये एकूण ५० व्हॉइस सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्यात आले या उपक्रमाचे उदघाटन आ. लंघे पाटील यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले.या प्रसंगी ते बोलत होते.माननीय न्यायालयाच्या निर्देशानुसार व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक विद्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अत्यंत आवश्यक असल्याचे आमदार लंघे पाटील यांनी सांगितले. ज्ञानोदय इंग्लिश स्कूल नेवासा या विद्यालयाने कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबवत असताना उचललेले हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

नेवासा तालुक्यातील सर्व शाळा व विद्यालयांनी या उपक्रमाचा आदर्श घेणे आवश्यक आहे. ज्ञानोदय इंग्लिश स्कूलच्या सर्वांगीण विकासासाठी शक्य होईल ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी लंघे पाटील दिले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील, अहिल्यानगर भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिनभाऊ देसरडा,किसनराव गडाख,अंकुश काळे,भाऊसाहेब वाघ, नगरसेवक कृष्णा परदेशी, नगरसेविका डॉ.मनिषा वाघ, राजेंद्र मुथ्था,रामभाऊ केंदळे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब चौधरी यांनी स्वागत करून विद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी पर्यवेक्षिका सुनिता दिघे, शिक्षक अनिल भणगे, सुधीर बोरकर, काकासाहेब काळे, शिरीष राऊत, किरण धाडगे आदी उपस्थित होते. शिक्षक संजय आखाडे यांनी सूत्रसंचालन करून आभार व्यक्त केले.

## श्रीरामपूर तहसील कार्यालयात हायटेक 'आधार' सेवा सुरू



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील तहसील कार्यालयात नागरिकांच्या सुविधेसाठी अमोल लबडे यांच्या 'आधार नोंदणी व दुरुस्ती केंद्राचा' बुधवारी दिमाखदार शुभारंभ करण्यात आला. या नवीन केंद्रामुळे आता श्रीरामपूरकरांना आधार संबंधित कामांसाठी पायपीट करावी लागणार नसून, जलद सेवा उपलब्ध होणार आहे. या केंद्राचे उद्घाटन श्रीरामपूरचे प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या हस्ते व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, अभया राजवाळ आदींच्या उपस्थितीत फित कापून करण्यात आले.

यावेळी प्रांत व तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केवळ उद्घाटन करून न थांबता, प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी स्वतःच्या आधार कार्डावरील नाव आणि फोटो दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करून या केंद्राच्या कामकाजाचा श्रीगणेशा केला. यावेळी त्यांनी केंद्रातील उपकरणांची आणि सुविधांची पाहणी केली. याप्रसंगी बोलताना प्रांताधिकारी सावंत पाटील म्हणाले की, येणाऱ्या प्रत्येक नागरिकाशी सौजन्याने संवाद ठेवा. केंद्राबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासकीय शुल्काव्यतिरिक्त अधिकचे पैसे घेऊ नका. तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मध्यवर्ती ठिकाणी हे केंद्र सुरू झाल्याने सामान्य जनतेचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचणार आहेत.

## नवोन्मेष स्पर्धेत प्रवरा फार्मसीच्या विद्यार्थिनीचा द्वितीय क्रमांक




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण औषधनिर्माण शास्त्र महाविद्यल्यातील विद्यार्थीनी कु.ज्ञानदा कानगुडे यांनी राज्यस्तरीय आविष्कार संशोधन नवोन्मेष स्पर्धा २०२६ मध्ये द्वितीय क्रमांक मिळवल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या मंगथायारु के. यांनी दिली. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ , परभणी यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन नवोन्मेष स्पर्धा २०२६ मध्ये राज्यभरातील २५ विद्यापीठांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. एकूण ९२७ विद्यार्थ्यांनी सहा विविध श्रेणींमध्ये त्यांचे संशोधन सादर केले. दोन टप्प्यांत पार पडलेल्या या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पोस्टर प्रेझेंटेशन तर दुसऱ्या टप्प्यात पोडियम प्रेझेंटेशन घेण्यात आले होते.

यासाठी निवडलेल्या २३७ विद्यार्थ्यांमध्ये मेडिसिन व फार्मसीच्या पदव्युत्तर गटातील स्पर्धा विशेषतः उच्च दर्जाची ठरली. या श्रेणीत ज्ञानदा कानगुडे यांनी उत्कृष्ट संशोधन कार्य सादर करत राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला. तिला या संशोधन कार्यासाठी डॉ. सुहास सिद्धेश्वर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना ३०,००० रुपयांची संशोधन फेलोशिप प्रदान करण्यात आली.

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- जि.अ.नगर ता. संगमनेर पैकी मौजे नामज दुमाला येथील ग.नं. ६४७२ मध्ये क्षेत्र २ हे. ०० आर, आकार ३ रु. ०० पैसे ही मिळकत अण्णा भाऊपाटील भाबड रा. नान्नज दुमाला ता. संगमनेर, जि.अ.नगर यांचे नावावर असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायम खरेदी देण्याचे ठरविले असून त्या अनुषंगाने अण्णा भाऊपाटील भावड यांनी आमचे अशिलांकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे.

वरील मिळकत निर्वेध, निष्कर्जी, कोणत्याही प्रकारचा बोजा नसल्याबाबतची तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वाद नसल्याची खात्री मुळ मालकानी आमचे अशिलांस दिली आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क अथवा इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा हक्क इ. असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध निर्जोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर केलेली कुठलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही तसेच परस्पर घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, ही नोटीस असे. ता.०५/०२/२०२६.

**ॲड. पी.एस. कोल्हे**
**जिजामाता प्राईड, गाळा नं. २०४,**
**संगमनेर कोर्ट समोर, पुलेवाडी,**
**ता.संगमनेर, जि.अ.नगर**
**मोबा.७५८८०२५३४१**

# हरीबाबा देवस्थानच्या विकासासाठी कटिबद्ध : आ. अमोल खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील वेल्हाळे येथील जागृत हरीबाबा देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून यापूर्वीच देवस्थानासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच २०२५ मध्ये महायुती सरकारच्या माध्यमातून, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हरीबाबा देवस्थानास 'क' वर्गाचा दर्जा मिळवून देण्यात आला असून, भविष्यात 'ब' वर्गाचा दर्जा मिळवून देऊन परिसराचा विकास करण्यात येईल, असा विश्वास आ अमोल खताळ यांनी व्यक्त केला.



हरीबाबा यात्रा उत्सवानिमित्त त्यांनी देवस्थानात दर्शन घेऊन भाविकांशी संवाद साधला. यावेळी शिवसेना तालुकाध्यक्ष रामभाऊ राहणे, भाजप राज्य कार्यकारणी सदस्य दादाभाऊ गुंजाळ, यात्रा समितीचे अध्यक्ष गोविंद जेडगुले यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, महायुती सरकारने तालुक्यातील सर्व देवस्थानांच्या विकासाला चालना दिली आहे. देव-धर्माच्या कामात राजकारण न करता जनतेच्या हिताचे निर्णय घेतले जात आहेत. मात्र काही जण विकासकामांचे खोटे श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला. तालुक्यातील विविध मंदिरांसाठी पर्यटन विभागाचा दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

वेल्हाळे परिसरातील पाणीप्रश्नाबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगून, जनतेचे काम करणे हाच आपला खरा आनंद असल्याचे आमदार खताळ यांनी नमूद केले.

**जत्रेत आमदारांचा साधेपणाचा ठसा**

दर्शनानंतर आमदार खताळ यांनी कार्यकर्त्यांसोबत जत्रेतील दुकानांवर बसून भेळ, रेवडी, दहिवडा यांचा आस्वाद घेत सर्वसामान्यांप्रमाणे जत्रेचा आनंद लुटला. दुकानदारांशी आपुलकीने संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्याने उपस्थितांमध्ये विशेष कौतुक झाले.

## पान १ वरुन

### पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षणाच्या नावाखाली मुलींवर बलात्कार

पीडितेने फिर्यादीने जावेद शेख यास लग्नाबाबत विचारणा केली असता त्याने साफ नकार दिला व तिला 'गजवा- ए- हिंद' म्हणाला त्यानंतर ऑक्टोबर २०२५ पर्यंत जीवे मारण्याची धमकी देत वारंवार जबरदस्तीने बलात्कार केला. त्यानंतर त्याच्या होणाऱ्या वारंवार त्रासाला कंटाळून पीडितीने त्याच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला तरी तो जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे तिने शेवटी वैतागून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ६४(एम)(एफ), ७५(१), ८८, ३५१(१) अन्वये जावेद शेख याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार झाले आहेत. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे करत आहेत

श्रीगोंद्यात गर्भपाताच्या गोळ्याची सर्रास विक्री?वैद्यकीय अधिकाऱ्याच्या चिठ्ठीशिवाय गर्भपाताच्या गोळ्या देण्यास कायदेशीर बंदी असतानाही श्रीगोंद्यात गर्भपात करण्यासाठी लागणाऱ्या मेडिसिनची खुलेआम विक्री केली जात असल्याचे या प्रकरणातून समोर आले आहे. त्यामुळे संबंधित मेडिकल चालकाला पोलीस आरोपी करणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### श्री मोहिनीराजांच्या उत्सवमूर्तीचे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांनी घेतले दर्शन

महाराजांचे संतपूजन करण्यात आले. यावेळी बोलतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की प्रवरामाईचा हा परिसर अमृत वाहिनी म्हणून संबोधला जातो.यात्रेनिमित्त आयोजित अमृतवाहिनी प्रवरामाई आरती सारखे उपक्रम धार्मिक वैभव वाढविणारे आहे,देशाची खरी शान, ताकद,संस्कार वृद्धिंगत करायचा असेल तर असे धार्मिक कार्यक्रम झाले पाहिजे,पुढच्या पिढीसाठी ते प्रेरणादायी ठरणार आहे,धर्म कार्य वृद्धिंगत करण्यासाठी मतभेदाची पायताणे बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

### पंतप्रधानांच्या उत्तराशिवायच राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील 'आभाराचा प्रस्ताव' मंजूर

लोकशाहीचा काळा दिवस आहे. टागोर यांनी आरोप केला की, केवळ सत्ताधारी भाजप सदस्यांनाच बोलण्याची संधी दिली गेली आणि करोडो भारतीयांचा आवाज असलेल्या विरोधी पक्षनेत्यांची मुस्कटदाबी करण्यात आली.

संसदेतील या हायव्होल्टेज ड्राम्यानंतर आता राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत.

### साई संस्थान 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने सन्मानित

डॉ. दीपक हरके यांनी ऑनर सर्टिफिकेट संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांचेकडे प्रदान केले. यावेळी संस्थानचे प्र.उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, प्रशासकिय अधिकारी संदिपकुमार भोसले, प्र. प्रशासकिय अधिकारी अतुल वाघ, मुख्य कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. या जागतिक मान्यतेमुळे श्री साईबाबा संस्थानचे धार्मिक, सामाजिक व मानवसेवेतील योगदान अधोरेखित झाले आहे. भाविकांच्या सेवेसाठी संस्थान सातत्याने करत असलेल्या कार्याला यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर नवा गौरव लाभला आहे

# श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त माऊलींची पालखीतून ध्वज मिरवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नगरीचे ग्रामदैवत व भगवान विष्णूंचे स्त्रीरूप अवतार असलेल्या श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रेरणेडरे संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी व ध्वज मिरवणूक दिंडीडरे काढण्यात आली. या दिंडीमुळे जणू माऊलीच श्री मोहिनीराजांच्या दर्शनाला आल्याची भावना वारकऱ्यांमध्ये होती.



नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरापासून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या दिंडीचा शुभारंभ देवस्थानचे विश्वस्त हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या हस्ते माऊलींच्या पादुका पूजनाने व ध्वज पूजनाने करण्यात आला. ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'',''बोल मोहिनीराज महाराज की जय''असा जयघोष यावेळी करण्यात आला. या पालखी दिंडीमध्ये गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख महंत ह भ प भगवानजी महाराज जंगले शास्त्री, रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, भागवताचार्य अंकुश महाराज जगताप, गहिनीनाथ महाराज आढाव, हरिभाऊ महाराज म्हस्के, गणेश महाराज आरगडे,अंजाबापू कर्डिले,संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त रामभाऊ जगताप,विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे, विश्वस्त कैलास जाधव यांच्यासह पंचक्रोशीतील वारकरी मंडळी भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.सदरची पालखी ज्ञानेश्वर महाराज मंदिर,संत तुकाराम महाराज मंदिर,लोखंडे गल्ली,संत ज्ञानेश्वर महाराज चौक,डॉ.हेडगेवार चौक,मारुती चौक मार्गे श्री मोहिनीराज मंदिर प्रांगणात आली. यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात श्री मोहिनीराजांचा नामघोष करण्यात आला. पालखीतील माऊलींच्या पादुका श्री मोहिनीराजांच्या मंदिरात आणण्यात आला. पादुकांडरे माऊलींनीच मोहिनीराजांची भेट घेतल्याचा प्रसंग यावेळी अनुभवयास मिळाले. यावेळी बोलतांना वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री म्हणाले, तीर्थक्षेत्र नेवासा नगरीचे ग्रामदैवत असलेल्या श्री मोहिनीराजांचा अवतार महिमा अगाध असा आहे त्यांच्या अवतार कार्याने नेवासे भूमीत देवदेवतांचा पदस्पर्श झाला. भगवान विष्णूंनी सुंदर ललनेचे रूप धारण करून दानवांना अमृत वाटपाने मोहिनी घातली तर त्याच भगवान विष्णूंनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अवतारात येऊन संस्कृतमधील गीता मराठी भाषेत अनुवादित केली म्हणून भगवान विष्णूंची कृपादृष्टी या क्षेत्रावर असल्याचे सांगत त्यांनी आपण खरे भाग्यवान असल्याचे म्हटले.

## श्रीरामपूर पालिकेची पहिली सभा तीन तास रंगली नगराध्यक्ष करण ससाणे यांनी कौशल्याने सभा हाताळली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा बुधवारी पालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या अध्यक्षते खाली अत्यंत उत्साहात आणि शांततेत संपन्न संपन्न झाली.सुमारे तीन तासापेक्षा जास्त वेळ चाललेल्या या सभेत त्यांनी सर्वांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली .तर अडचणींच्या प्रश्नांना कौशल्याने बगल देत उत्तर देणे टाळले. सर्वसाधारण सभेला सर्वच नगरसेवक उपस्थित होते.

शहरभर हिंडणाऱ्या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची मागणी त्याचबरोबर मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त , बिबटयांचा बंदोबस्त,आरोग्य सेवेचा उडालेला बोजवारा , पिण्याच्या पाण्यात गटारीचे मैला मिश्रित पाणी ,आत्मक्लेश आंदोलन , छत्रपतीसंभाजी महाराजांचापुतळाबसविण्याचीजागा,विस्थापितअतिक्रमणधारकांचे पुनर्वसनासाठी शासनाकडून मोफत जागा मिळवणे आदि विषय सभागृहात चर्चेला आणण्यात भाजपचे नगरसेवक तसेंच शिवसेना (शिंदे गट) हे थोडे आक्रमक होते. त्यांच्या आक्रमकतेमुळे थोडी चर्चा घडून आली. उपनगराध्यक्षांसह नूतन नगर सेवक महिला वुरुष नगरसेवका पैकी कांही जणशांत बसून होते. सभेतील चर्चेला विद्यमान स्वीकृत नगरसेवक अंजुम शेख, स्वीकृत नगरसेवक,श्रीनिवास बिहाणी, विद्यमान नगरसेवक दीपक चव्हाण -वैशाली चव्हाण, मुजफ्फर शेख, दिलीप नागरे, मंजुश्री मुरकुटे, राजेंद्र पवार, संतोष कांबळे, स्नेहल खोरे, तसेंच नव्याने निवडून आलेले संजय गांगड, आकाश बेग, अमोल धनवटे, आदिंनी सभेत विविध प्रश्न उपस्थित केल.

## नानासाहेब गलांडे यांचे अपील मंजूर जबरदस्तीने केलेल्या जमिनीच्या नोंदी रद्द

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील वादग्रस्त जमिनीच्या नोंद प्रकरणात नानासाहेब काशिनाथ गलांडे पाटील यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अंतर्गत दाखल केलेले त्यांचे अपील मंजूर करत उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक विभाग यांनी जबरदस्तीने व चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेल्या फेरफार नोंदी रद्द करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. हा अंतिम निकाल ३० जानेवारी २०२६ रोजी लागला.या आदेशानुसार गट क्रमांक ८७९ व ९०० मधील फेरफार क्रमांक ११० व १११ (दि. ८ जुलै २०१९) या नोंदी रद्द करण्यात आल्या आहेत. यामुळे मूळ व कायदेशीर नोंदी कायम ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित असून अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणासंदर्भात यापूर्वी भगवान के घर देर है, अंधेर नहीं या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यावेळी नाशिक विभागीय उपायुक्त अजय मोरे यांनी दिलेला निकाल समाधानकारक ठरला होता. संबंधित पक्षकारांनी गट क्रमांक ७९ मध्ये जमिनीची खरेदी केलेली असतानाही राजेंद्रकुमार दुधेडिया व प्रवीणकुमार उत्तमचंद छल्लानी यांनी ती नोंद चुकीच्या व अनधिकृत पद्धतीने गट क्रमांक ७८ मध्ये करण्यात आली होती. हीच चुकीची नोंद पुढे शहर सर्वेक्षण अभिलेखातही परावर्तित झाल्याने मूळ जमिनीच्या नोंदींमध्ये गंभीर विसंगती निर्माण झाली होती.

# प्रकाश भोंडगे यांचा सेवापूर्ती सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** :श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील सामाजिक कार्यकर्ते श्री त्रिंबक भोंडगे यांचे दोन्ही सुपुत्र प्रकाश भोंडगे व मारुती भोंडगे भारतीय सैन्य दलात देशाची सेवा करत आहेत यापैकी प्रकाश त्र्यंबक भोंडगे हे नुकतेच देश सेवेतून निवृत्त झाले त्याबद्दल वडाळा महादेव ग्रामस्थांच्या वतीने तसेच श्रीरामपूर तालुका माजी सैनिक संघटना विविध कार्यकारी सोसायटी ग्रामपंचायत शैक्षणिक संस्था विवीध संघटना यांचे वतीने भव्य सेवापुर्ती सोहळा मोठ्या उत्साहात येथील त्र्यंबकेश्वर मंदिरातील सभागृहामध्ये पार पडला याप्रसंगी श्रीरामपूर तालुक्यातून सेवानिवृत्त होणाऱ्या सैनिकांना श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येत असते याप्रसंगी तालुक्याचे माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष मेजर कृष्णा सरदार मेजर बाळासाहेब




उंडे अनिल लगड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी ज्येष्ठ नागरिक सुधीर नामदेव कसार होते प्रसंगी राजेंद्र पा पवार यांनी मेजर प्रकाश भोंडगे यांनी देशसेवेनंतर आता वडाळा महादेव गावचे सरपंच पद भूषवावे व गावाचा विकास करावा अशी मागणी केली यावेळी येथील आजी माजी सैनिकांनी विशेष प्रयत्न केले यावेळी मेजर खलाटे मेजर केरू बाराहाते मेजर गोडसे मेजर रंजकराव कसार मेजर अनिल राऊत मेजर बाबासाहेब लांडे कॅप्टन अजय उघडे मेजर मारुती भोंडगे मेजर गणेश काळे मेजर सुलताने मेजर भालेराव मेजर राशिनकर मेजर नन्नवरे मेजर प्रशिल शिरसाठ मेजर लक्ष्मण मलिक मेजर सय्यद मेजर नचिकेत कसार मेजर अक्षय गीते मेजर प्रशांत गायकवाड मेजर उदमले मेजर गवारे मेजर राजू गायकवाड मेजर जेठे मेजर सिन्नरकर हे सर्व वडाळा महादेव येथील रहिवासी असून भारतीय सैन्य दलात आजी व माजी सैनिक म्हणून कार्यरत आहेत संपूर्ण श्रीरामपूर तालुक्यात वडाळा महादेव येथील भारतीय सैन्य दलात सर्वात जास्त आजी व माजी सैनिक आहेत यावेळी मेजर रमेश माळी मेजर अशोक कायगुडे मेजर कैलास गोरे मेजर चांगदेव धाकतोडे मेजर सुरेश सांगळे मेजर दत्तात्रेय सोनवणे मेजर भगिरथ पवार मेजर माधवराव ढवळे तसेच सैनिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मेजर कृष्णा सरदार अनिल लगड बाळासाहेब उंडे यांनी आपले मत व्यक्त केले गावातील सैनिक संघटनेच्या वतीने सर्व आजी व माजी सैनिकांचा सत्कार केला व प्रकाश त्रंबक भोंडगे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या येथिल दिवंगत सैनिक मेजर बाबुराव देसाई व मेजर अब्दुलभाई पठाण यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येऊन वंदे मातरम घेऊन कार्यक्रमांची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री संदीप कसार सर यांनी करत उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले

## निधन वार्ता

### कारभारी गायकवाड



**बेलापूर** : येथील जुन्या पिढीतील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते कारभारी भाऊराव गायकवाड (वय - ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली,सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जिजामाता पतसंस्थेचे व्यवस्थापक भरत गायकवाड तसेच शरद गायकवाड यांचे ते वडील होत.

## आश्वी महाविद्यालयात विद्यार्थिनींना स्वसंरक्षण व कायद्याचे धडे

**आश्वी** । संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथील कला, वाणिज्य, विज्ञान व बीसीएस महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियाना' अंतर्गत विद्यार्थिनींसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

आजच्या धावपळीच्या आणि असुरक्षित वातावरणात स्वतःचे संरक्षण स्वतः करता यावे, यासाठी महाविद्यालयात विशेष कराटे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. तज्ज्ञ प्रशिक्षक वैष्णवी कहार व संजना मुके यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे मूलभूत धडे दिले.

केवळ शारीरिक सक्षमताच नव्हे, तर कायदेशीर माहिति असणे ही काळाची गरज ओळखून 'स्त्री सशक्तीकरणासाठी कायद्याची ओळख' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

संगमनेर जिल्हा व सत्र न्यायालयातील ॲड. माधुरी फटांगरे यांनी यावेळी विद्यार्थिनींना महिला संरक्षण कायदे, हक्क आणि कायदेशीर उपाययोजनांची सखोल माहिती देऊन विद्यार्थिनींमध्ये कायद्याची जाणीव निर्माण केली.

प्रा. देविदास दाभाडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना जीवनात निर्भय राहण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास कल्याण मंडळाच्या समन्वयक डॉ. सुवर्णा जाधव होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला सबलीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. नीतू मांढरे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा खेमनर हिने केले. आभार प्रा. सुनंदा पाचोरे यांनी मानले. तर, या उपक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला.



## कलयुगातही माणुसकीचे दर्शन सापडलेले दागिने मूळ मालकास परत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : आजच्या धावपळीच्या व स्वार्थी युगात प्रामाणिकपणाची उदाहरणे दुर्मिळ होत असतानाच, संगमनेर तालुक्यातील खरशिंदे येथील शेख कुटुंबियांनी माणुसकीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. रस्त्यावर सापडलेली सुमारे ८० ते ९० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत (गठन) व रोख रक्कम मूळ मालकास प्रामाणिकपणे परत करून 'माणुसकी हाच खरा धर्म' असल्याचे त्यांनी सिद्ध केले.

मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी खरशिंदे येथील रहिवासी रशिद चंदुलाल शेख हे आश्वीवरून घरी परतत असताना शिबलापूर-पानोडी शिवारातील रस्त्यावर त्यांना एक पर्स पडलेली आढळली. त्यांनी ती पर्स उचलून सुरक्षितपणे घरी आणली. पर्समध्ये सोन्याचे मौल्यवान दागिने, १२५ रुपये रोख रक्कम तसेच एका कृषी सेवा केंद्राचे बिल होते.

रशिद शेख यांचा मुलगा मोसीन शेख याने प्रसंगावधान राखत बिलावरील संपर्क क्रमांकावर फोन करून माहिती घेतली. चौकशीत ही पर्स पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील सुभाष चंद्रकांत गावडे यांची असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मोसीन शेख यांनी तात्काळ गावडे यांच्याशी संपर्क साधून पर्स सापडल्याची माहिती दिली.

बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी सुभाष गावडे यांना खरशिंदे येथे बोलावून पर्समधील वस्तूंची खातरजमा केल्यानंतर रशिद शेख यांनी ती पर्स सन्मानपूर्वक त्यांच्या स्वाधीन केली. अंदाजे ८० ते ९० हजार रुपये किमतीचे दागिने परत मिळाल्याने गावडे भावुक झाले व त्यांनी शेख कुटुंबियांचे मनःपूर्वक आभार मानले.

मोठ्या किमतीचे सोने सापडूनही कोणताही मोह न ठेवता ते परत करणाऱ्या रशिद व मोसीन शेख यांच्या प्रामाणिकपणाचे संगमनेर व पारनेर परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## गावठी दारू अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील वांबोरी परिसरात बेकायदा गावठी दारूची विक्री करणाऱ्या एका इसमावर राहुरी पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी गावठी हातभट्टीची दारू जप्त करून एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास वांबोरी बाजारतळ परिसरातील एका टपरीच्या आडोशाला अवैध दारूची विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती राहुरी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सुनील भानुदास निकम व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला.

पोलिसांनी केलेल्या या कारवाईत म्हसु शेरीबा फुलारी (वय ६० वर्षे, रा. वांबोरी) याला ताब्यात घेतले. आरोपीकडून प्लास्टिकच्या ड्रममध्ये साठवून ठेवलेली सुमारे १५ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू जप्त करण्यात आली असून, तिची अंदाजे किंमत ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार बबन राठोड करीत आहेत.दरम्यान, बेकायदा दारू विक्रीविरोधात पोलिसांनी मोहीम अधिक तीव्र केल्याने अवैध व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME SALIM SHAIKH LATIF ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SALIM LATIF PINJARI (AADHAR NO. 2232 7798 5304) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SANGAMNER PLACE: SANGAMNER DATE :05/02/2026

## स्कोडा कायलकने ५०,००० विक्रीचा टप्पा गाठला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक** : २०२५ मध्ये विक्रीचे सर्वात यशस्वी वर्ष नोंदवल्यानंतर आणि नवीन कुशाक सादर केल्यानंतर, स्कोडा ऑटो इंडिया त्यांच्या वाढत्या उत्पादन श्रेणीसह त्यांची प्रगती कायम ठेवत आहे. ब्रँडने त्यांची सर्वाधिक विकली जाणारी कार, कायलक च्या व्हेरिएंट्सची श्रेणी विस्तारून आणि ग्राहकांना जास्त व्हेरिएंट्स, भरपूर पर्याय व अधिक मूल्य प्रदान करून, भारतीय रस्त्यांवर युरोपियन तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध करून देण्याच्या आपल्या धोरणाला पुढे नेले आहे.

कायलक हे भारतात स्कोडा ऑटो च्या वाढीच्या प्रवासाचा एक मजबूत आधारस्तंभ म्हणून उदयास आले आहे. लाँच झाल्यापासून ५०,००० हून अधिक गाड्यांची विक्री झालेल्या कायलक ने, देशातील या ब्रँडच्या २५ व्या वर्षात स्कोडा ऑटो इंडिया च्या आतापर्यंतच्या सगळ्यात चांगल्या विक्री कामगिरीमध्ये मोठे योगदान दिले आहे. कायलक ची सुरक्षा, ड्रायव्हिंग डायनॅमिक्स, तंत्रज्ञान आणि किमतीचे योग्य संयोजन ग्राहकांना खूप आवडले असून, सब- ४एम एसयूव्ही सेगमेंटमध्ये ती एक प्रमुख स्पर्धक म्हणून उभी आहे.




कायलक च्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त भाष्य करताना, स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड डायरेक्टर आशीष गुप्ता, म्हणाले, कायलक म्हणजे भारताप्रती असलेल्या आमच्या दीर्घकालीन वचनबद्धतेचा एक भक्कम पुरावा आहे आणि यामुळे आम्ही बाजारातील सर्वात स्पर्धात्मक सेगमेंटमध्ये प्रवेश केला. ५०, ००० विक्रीचा टप्पा पार करणे ही खरोखरच एक आनंद देणारी बाब असून स्कोडा ब्रँडवरील वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे. ही गती कायम ठेवण्यासाठी, आम्ही ग्राहकांच्या सूचनांनुसार सुधारणा करून कायलक लाइन-अपचा विस्तार करून, कायलक ला त्याच्या सेगमेंटमधील रिअल ऑटोमॅटिक ट्रान्समिशन असलेली सर्वात सहज उपलब्ध होणारी गाडी बनवत आहोत. हे अपग्रेड्स आजच्या ग्राहकांसाठी सर्वात महत्त्वाच्या असलेल्या वैशिष्ट्यांना, सर्व व्हेरिएंट्समध्ये, सर्वांसाठी उपलब्ध करून देतात. अधिक व्यापक आणि सुव्यवस्थित श्रेणी, आणि या वर्षाच्या उत्तरार्धात नियोजित असलेल्या अधिक रोमांचक नवीन गोष्टींसह, कायलक भारतीय रस्त्यांसाठी युरोपियन तंत्रज्ञान, उच्च मूल्य आणि उत्कृष्ट ड्रायव्हिंग अनुभव देण्याच्या आमच्या वचनबद्धतेला सातत्याने प्रतिबिंबीत करत आहे.

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि. ५ फेब्रुवारी २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१३७ ३८० ३३५ | १-९ | १२६ १५० ११९

जोड १२-८९-३४ ७९-९०

### कल्याण

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१८० २८९ ३८८ | ९-२ | १५६ १२९ ११०

जोड ९०-१२-४८ ५७-२६

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

१४० २३० ७८० | ५-१ | १२८ २९० १००

जोड २१-६७-३४ ०९-७५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## दखल

### श्री मार्कंडेय मंदिरात सदगुरु श्री गजानन महाराज प्रकट दिन कार्यक्रम



**नगर :** सदगुरु श्री गजानन महाराज प्रकट दिन रविवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी येत असून या दिवशी सालाबाद प्रमाणे श्री. मार्कंडेय मंदिर देवस्थान, गांधी मैदान, अहिल्यानगर येथे श्री सद्गुरु गजानन महाराज प्रकट दिन सोहळा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थानचे उपाध्यक्ष त्रिलेश येनगंदुल यांनी दिली. प्रकट दिनी सकाळी श्रींचा अभिषेक व आरती तसेच प्रसाद वाटप, सायंकाळी ५ वाजता श्री अंबिका महिला भजनी मंडळाचा भजनांचा कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता श्री सद्गुरू गजानन महाराजांची महाआरती, व संध्या.७.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संध्या. ७.३० ते रात्री ९ वाजता भजन संध्या. याप्रमाणे प्रकट दिनाच्या दिवशी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, तरी सर्व भक्तांनी या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन श्री सद्गुरूंचे दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

### तिसगाव येथे संत नरहरी महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



**करंजी :** संत परंपरेचा वारसा जपणारे, समाजाला सदाचार, प्रामाणिकपणा व भक्तीचा संदेश देणारे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तिसगाव येथील महादेव मंदिर परिसरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पुण्यतिथी सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसीय धार्मिक व सांस्कृतिक सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात पार पडला. भव्य मिरवणुकीने होणार सोहळ्याची सुरुवात झाली. बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता महाआरती झाल्यानंतर महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पवित्र व शुभमंगल प्रसंगी समाजातील सर्व बांधवांनी, भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित दर्शवली त्या बद्दल प्रमोद बेदे यांनी सर्वांचे आभार मानले.



संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त लाड सुवर्णकार समाजाच्या वतीने अहिल्यानगर कोर्ट गल्ली येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोपप्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप. समवेत ह. भ. प. जनार्दन महाराज माळवदे समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर व उपस्थित समाजबांधव. (छाया: सुरेश मैड)

## संतांची परंपरा पुढच्या पिढीपर्यंत जावी : आ. संग्राम जगताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर :** भारतीय संस्कृतीमध्ये तत्कालीन परिस्थितीत अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालत समाजामध्ये जागरूकता आणण्याचे काम संतांनी केले. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारत महासत्तेकडे जात असताना आपली भारतीय संस्कृती ,परंपरा ,संतांचे विचार पुढच्या पुढच्या पिढीपर्यंत घेऊन जाणे ही आजच्या काळाची गरज आहे. महान विठ्ठल भक्तीचे पाईक असणारे संत शिरोमणी नरहरी महाराज आणि त्यांची शिकवण आज या सप्ताहाच्या निमित्ताने पुढच्या पिढीपर्यंत जात आहे .संत विचारांची परंपरा पुढे घेऊन जाण्यासाठी असे कार्यक्रम प्रेरक असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त लाड सुवर्णकार समाज विश्वस्त संस्था व युवक मंडळाच्या वतीने कोर्ट गल्ली येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित सप्ताहाच्या समारोपसंगी आमदार जगताप बोलत होते. याप्रसंगी ह भ प जनार्दन महाराज माळवदे यांचे काल्याचे किर्तन झाले. या कार्यक्रमास मा. उपनगराध्यक्ष किशोर भोसले नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, पै.मनोज सुभाष लोंढे, संतोष ग्यानप्पा ,नगरसेवक गणेश कवडे ,सौ आशा किशोर डागवाले समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी आमदार संग्राम जगताप यांचा ह भ प माळवदे महाराज यांनी सत्कार केला. नवनिर्वाचित नगरसेवक यांच्या सन्मान संजय देवलालीकर यांनी केला.

# स्व. अजितदादांच्या स्मरणार्थ पारनेरमध्ये राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

## ‘कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली’ : खा. निलेश लंके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर येथे स्व. अजित पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि ‘कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली’ या भावनेतून खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे कृषी प्रदर्शन दि. १९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पारनेर बाजार समिती शेजारील मैदानावर भरविण्यात येणार आहे. खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत बुधवारी पारनेर येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.

या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामध्ये ट्रॅक्टर, आधुनिक शेती अवजारे, बी-बियाणे, रासायनिक, सेंद्रिय व जैविक खते, औषधे, ठिबक सिंचन, शेततळी, दूध काढणी यंत्रे, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधमाशी पालन, रोपवाटिका, पशुआहार आदी शेती व शेतीपूरक व्यवसायांशी संबंधित सर्व साहित्य व माहिती उपलब्ध होणार आहे. यासोबतच कांदा व ऊस पिकवाढीबाबत मार्गदर्शन तसेच नव्या ए.आय. तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात कृषी विद्यापीठ, जिल्हा व तालुका कृषी विभाग, आत्मा योजना तसेच विविध शासकीय बँकांचे माहितीपर स्टॉल्स असणार असून, शासकीय योजनांचा लाभ व तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी मिळणार आहे. प्रदर्शनाचे खास आकर्षण म्हणून जगातील एकमेव आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेली अवघी २ फूट ८ इंच उंचीची ‘राधा’ ही जगातील सर्वात बुटकी म्हैस पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहे.

या कृषी प्रदर्शनाचे यशस्वी नियोजन गेल्या ११ वर्षांपासून महाराष्ट्रात कृषी प्रदर्शनांचे आयोजन करणाऱ्या पी.जे.एम. इव्हेंट मॅनेजमेंट, काष्टीचे बंडू पाचपुते व गणेश जठार यांनी केले आहे. यावेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



### कांदा उत्पादकांच्या आंदोलनाप्रकरणातून खा. निलेश लंकेंसह १२ निर्दोष

**अहिल्यानगर :** सन २०२३ मध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी नगर–पुणे महामार्गावर सुपा चौक येथे करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनप्रकरणी विद्यमान खासदार नीलेश लंके यांच्यासह सर्व १२ आरोपींची नगर येथील न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी मा. जी. जी. सोनी यांनी दिलेल्या निर्णयानुसार, आरोपींविरोधात दाखल करण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम ३४१ व १८८, राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ चे कलम ८(ब) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये कलम १३५ अंतर्गतचे आरोप संशयमुक्त पुराव्यांद्वारे सिद्ध होऊ शकलेले नाहीत. न्यायालयाने नमूद केले की, आंदोलनादरम्यान कोणालाही इजा झाल्याचा अथवा सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण झाल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९५ ची पूर्तता न करता भारतीय दंड संहिता कलम १८८ अंतर्गत आरोप ठेवणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येत नसल्याचे न्यायालयाने मान्य केले. ॲड. फळे यांना ॲड. राहुल झावरे, ॲड. शुभम राजुरकर, ॲड. साक्षी जाधव, ॲड. आनंद कुलकर्णी, ॲड. निखिल मुसळे, ॲड. प्रतीक ढमढेरे, ॲड. आकाश पवार यांनी सहाय्य केले.

### तनपुरेवाडी शाळेचे जिल्हास्तरावर दैदिप्यमान यश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** अहिल्यानगर जिल्हा परिषद आयोजित विविध गुणदर्शन स्पर्धांचा अंतिम टप्पा नुकताच रेसिडेन्शियल हायस्कूल, अहिल्यानगर येथे पार पडला. जिल्ह्यातील १४ तालुक्यांतून तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेले स्पर्धक या जिल्हा पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाले होते. पारनेर तालुक्यातील तनपुरेवाडी (निघोज) जिल्हा परिषद शाळेच्या बालगटातील समूहगीत गायन संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश मिळवले.

‘आनंदाचे गाणे’ या श्रवणीय गीताचे अतिशय सुंदर व भावपूर्ण सादरीकरण करत तनपुरेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी १४ तालुक्यांतील तुल्यबळ संघांना मागे टाकत परीक्षकांची व प्रेक्षकांची वाहवा मिळवली. तसेच बालगटातील वैयक्तिक गीतगायन स्पर्धेत कैवल्य योगेश कवाद याने स्वतः हार्मोनियम वाजवत ‘ठेविले अनंते तैसेची रहावे’ हा कर्णमधुर अभंग सादर करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला.

या दोन्ही सादरीकरणांना शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी वाद्यवृंदाची उत्कृष्ट साथ दिली.

समूहगीत गायनात अविष्कार गायकवाड, दुर्गा लोखंडे, शिवन्या कवाद, श्रेयश मेहेर, रुचिका लंके, त्रिशा लंके, स्वरा राठोड, स्वरा सोनवणे, आराध्या सोबले, प्रिया गाजरे व कैवल्य कवाद सहभागी होते. या यशाबद्दल निघोज ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती व विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सत्कार करून अभिनंदन केले. शिक्षक संतोष साबळे यांनी गीतगायनाचे दिग्दर्शन केले, तर कांतीलाल दिवेकर यांनी तबल्याची साथ दिली. या यशामुळे पारनेर तालुक्याची मान जिल्ह्यात उंचावली आहे.

### लोणी व्यंकनाथ येथे तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद

#### आरोग्य योजनांतील गंभीर त्रुटी उघड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** इकोनेट, पुणे संस्थेच्या वतीने लोणी व्यंकनाथ येथे मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समिती श्रीगोंदा येथील सहाय्यक गटविकास अधिकारी रणजित अकुलवार, कक्ष अधिकारी महेश थोरात, विस्तार अधिकारी मनोज बनकर, संदीप आल्हाट तसेच पॅनलिस्ट ॲड. महेंद्र शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या सुनिता भोसले, पत्रकार बाळासाहेब काकडे, डॉ. सचिन जाधव व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले. या जनसंवादाला लोणी व्यंकनाथ, बेलवंडी बुद्रुक, काष्टी प्राथमिक आरोग्य केंद्रांसह राजापूर, चिंभळा व लिंपणगाव उपकेंद्रांतील हक्कधारक महिला–पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात जननी सुरक्षा योजना व मातृत्व वंदना योजनांचा एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीतील १४९ महिलांचा सखोल अभ्यास मांडण्यात आला. परालिगल कार्यकर्ता संतोष भोसले यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मातृत्व वंदना योजनेतील ३७ महिलांपैकी २० महिलांना पहिला तर २३ महिलांना दुसरा हप्ता मिळालेला नाही. जननी सुरक्षा योजनेत ६८ पैकी ६१ महिलांना लाभ नाकारण्यात आला. १४९ गर्भवती महिलांपैकी केवळ २५ महिलांना मोफत सोनोग्राफी मिळाल्याचेही समोर आले.

## खोट्या तक्रारी करून मानसिक त्रास

### माजी सरपंच संतोष पवारांचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथे विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून २००८ पासून स्वस्त धान्य दुकान चालवित असून, राजकीय विरोधातून माझ्याविरोधात खोट्या तक्रारी दाखल करून मानसिक त्रास दिला जात आहे, असा गंभीर आरोप नान्नजचे माजी सरपंच संतोष पवार यांनी केला आहे.

पवार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नान्नज गावातील काही राजकीय विरोधकांनी स्वस्त धान्य दुकानाच्या बाबतीत खोट्या तक्रारी केल्या आहेत. तक्रारदारांपैकी अनेकजण प्रत्यक्ष लाभार्थी नसून काहींनी कधीही दुकानातून धान्य घेतलेले नाही. तसेच एकाच कुटुंबातील अनेक व्यक्तींच्या नावाने तक्रारी दाखल करून खोट्या सह्या केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काही लाभार्थ्यांची नावे परवानगीशिवाय वापरून बनावट सह्या केल्याचेही त्यांनी नमूद केले.

स्वस्त धान्य दुकानातील संपूर्ण वितरण ई-पॉस मशीनद्वारे ऑनलाईन पद्धतीने केले जात असून, मागील सहा महिन्यांतील दुकान उघडण्याची व धान्य वाटपाची सविस्तर माहिती उपलब्ध असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. कोरोना काळापासून वार्डनिहाय व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे लाभार्थ्यांना पूर्वसूचना देऊन नियोजनबद्ध वाटप केल्याने गर्दी न होता वेळेत धान्य दिले जाते. नान्नज गावात दोन स्वस्त धान्य दुकाने असून, मागील सहा महिन्यांत आपल्या दुकानाचे वाटप प्रमाण अधिक व नियमित असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, बदनामी व मानसिक त्रास टाळण्यासाठी जानेवारी महिन्याचे धान्य वितरण इन–कॅमेरा पद्धतीने करण्यात आले असून, तहसील कार्यालय जामखेड व अहिल्यानगर पुरवठा विभागातील अधिकारी ऑनलाईन पद्धतीने वाटप पाहू शकतील, अशी व्यवस्था केल्याचे त्यांनी सांगितले.

तक्रारदारांपैकी कोणतेही दहा लाभार्थी तहसील कार्यालयात समोर येऊन तक्रार खरी असल्याचे सिद्ध केल्यास आपण स्वस्त धान्य दुकानाचा राजीनामा देण्यास तयार असल्याचे पवार यांनी जाहीर केले आहे. अन्यथा खोट्या तक्रारी व बदनामीस कारणीभूत असणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार व तालुका पुरवठा निरीक्षक, जामखेड यांना देण्यात आले आहे.

आमने–सामने

## नान्नज येथील रेशन दुकानावर कारवाई करा

### रेशनधारकांचे तहसीलदारांकडे निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथील स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्थेकडे असलेल्या स्वस्त धान्य दुकानात रेशनधारकांना योग्य सेवा मिळत नसून वेळेवर व पूर्ण धान्य दिले जात नाही. त्यामुळे या रेशन दुकानावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नान्नज येथील अनेक रेशनधारकांनी तहसीलदार जामखेड यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात रेशनधारकांनी म्हटले आहे की, सदर रेशन दुकानामुळे लाभार्थ्यांना सातत्याने त्रास सहन करावा लागत आहे. दुकान वेळेवर उघडले जात नाही, रेशन पावती दिली जात नाही, त्यामुळे किती धान्य आले व किती वितरित झाले याची माहिती नागरिकांना मिळत नाही. दुकान कधी सुरू असते, कधी बंद असते याची कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही. तसेच दुकानासमोर दरपत्रक लावलेले नसल्याने लाभार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. महिलांशी अरेरावीची भाषा, ज्येष्ठ नागरिकांचा अपमान, दहशतीचे वातावरण निर्माण करणे, विविध कुपनधारकांना मिळणाऱ्या धान्याची स्पष्ट माहिती न देणे, तसेच मोठ्या प्रमाणात धान्याचा काळाबाजार होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे नान्नज येथील रेशनधारकांना सदर दुकानातून वगळून दुसऱ्या संस्थेकडे वर्ग करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या निवेदनावर संजय दळवी, अंकुश मोहळकर, अस्लम शेख, गोरख मोहळकर, राहुल मोहळकर, अर्जुन दळवी, गौतम साठे, बंडू मोहळकर, रियाज चाऊस, सुनील भुजबळ, उदव मोहळकर यांच्यासह अनेक रेशनधारकांच्या सह्या आहेत. दरम्यान, २६ जानेवारी रोजी झालेल्या ग्रामसभेतही या रेशन दुकानाविरोधात ठराव करण्यात आला होता. हा विषय पुरवठा विभागाशी संबंधित असल्याने तहसील कार्यालयाकडे तक्रार नोंदवण्याचा निर्णय ग्रामसभेत बहुमताने घेण्यात आला असून, त्यानुसार ३ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायतीकडून ठरावाचे पत्र देण्यात आले आहे.

■ **नान्नज येथील स्वस्त धान्य दुकानाबाबत प्राप्त तक्रारींचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असून, त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.**

**–जालींदर कदम**
**पुरवठा निरीक्षक**

## लोहसर देवस्थान शेतीसह कृषी पर्यटन केंद्र बनवणार : गिते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** लोहसर ता. पाथर्डी येथील श्री काळ भैरवनाथ देवस्थान हे स्वतःच्या मालकीची असलेल्या शेतामध्ये शेती करून त्यामध्ये कृषी पर्यटनही राबवणार असल्याचे प्रतिपादन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व लोहसर गावचे सरपंच अनिल गिते यांनी सांगितले. देवस्थानच्या जमिनीच्या कामाच्या शुभारंभ करण्यात संतोष महाराज गीते यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी सरपंच जगन्नाथ गिते, रविदेवा जोशी, रावसाहेब वांढेकर यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैभव संपन्न जागृतचे काळ भैरवनाथ देवस्थान ट्रस्टची स्व मालकीची ७५ एकर जमीन लोहसर व खांडगाव येथे असून ही जमीन गेली ४० वर्षापासून पडीक होती. लोहसर येथील जोगेश्वरी फार्म या २२ एकर जिरायत जमीनीचे बागायत करण्याचे काम युद्ध पातळीवर देवस्थान ट्रस्टने हाती घेतले आहे. २२ एकर जमीनीची दुरुस्ती चालू आहे. संपूर्ण जमिनीला जाळीचे कुंपण,दोन एकरचा शेत तलाव, मोठ्या आकाराच्या दोन विहिरी,तीन किलोमीटरची पाईपलाईन करून हे सर्व क्षेत्र बागायत केल्यानंतर येत्या जून महिन्यामध्ये या २२ एकर क्षेत्रापैकी दहा एकर क्षेत्रावर चार हजार डाळिंब,८ एकर क्षेत्रावर अडीच हजार संत्राची व चोही बाजूने ५०० नारळ झाडे लागवड केली जाणार आहेत.

आज नारळ झाडांचे वृक्षारोपण हभप महंत संतोष महाराज शास्त्री,जगन्नाथ गीते विष्णू खेडकर, रावसाहेब वांडेकर बाबाजी गीते देवस्थान अध्यक्ष अनिल गीते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

सर्व फळझाडे ठिबक सिंचन वर व अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. या पूर्ण क्षेत्रांमध्ये अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, स्वतंत्र वीज ट्रांसफार्म, सोलर संच व मजूर रहिवासाची व्यवस्था केली जाणार आहे राज्यात अनेक देवस्थानकडे पुष्कळ जमीन आहे.

त्या जमिनी फक्त देवस्थानच्या नावावर आहेत देवस्थानकडे ताबा नाही. राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये फळबाग करणारे व प्रत्यक्षात स्वतः देवस्थान ट्रस्ट शेती करणारे भैरवनाथ देवस्थान एकमेव देवस्थान आहे असल्याचे गिते यांनी सांगितले.



द • ख • ल

## नवीन व अत्याधुनिक क्रीडांगण नूतनीकरण होणार

**शिरूर :** शिरुर नगरपरिषदेतील शाळा क्र ५ व ७ यांना पीएम श्री (केंद्र सरकार )योजनेमधून क्रिडांगण नूतनीकरण मंजूर झाले आहे त्या कामाचा शुभारंभ नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.ऐश्वर्याताई पाचर्णे तसेच उपनगराध्यक्ष तथा सभापती शिक्षण समिती मितेश गादिया ,नगरसेविका स्वप्नालीताई जामदार,नगरसेविका श्रीमती संगीताताई मल्लाव यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्यावेळी पंचायत समितीचे अधिकारी ,शिक्षक वृंद व मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते. तसेच शाळेला नवीन व आधुनिक क्रीडांगण मिळणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले होते.



## चारचाकी वाहनांसाठी नवीन मालिकेतील आकर्षक क्रमांकांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नाझरे सुपे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु होत असून आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक तीनपट व नियमित शुल्क भरून राखून ठेवण्यासाठी आगाऊ अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

चारचाकी वाहनांसाठी पसंती क्रमांकाकरिता अर्ज ६ फेब्रवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत स्वीकारले जातील. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास लिलाव ९ फेब्रवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता घेण्यात येईल. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा डीडी हा ठ.ढ.ज., झींपश या नावे नॅशनलाइज्ड/शेड्युल्ड बँकेचा असावा व दोन महिन्यांपेक्षा जुना नसावा. चुकीची फी, चुकीचा डीडी किंवा अपूर्ण अर्ज बाद करण्यात येतील. समान रक्कमेचे डीडी असल्यास चिठ्ठीद्वे निर्णय घेतला जाईल.

पसंती क्रमांक आरक्षित करण्यासाठी र्हीींिी://षरपलू. रिॲळींरहरप.सीं.ळप या संकेतस्थळावर नोंदणी करून शुल्क भरता येईल,असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## करंदी येथे जुगार खेळणारे शिक्रापूर पोलिसांच्या जाळ्यात

**तळेगाव ढमढेरे:** करंदी (ता. शिरूर) येथे पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळणाऱ्या दोन माजी उपसरपंचांसह तीन इसमांवर शिक्रापूर पोलिसांनी छापा टाकत कारवाई करत माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग आनंदराव ढोकले, माजी उपसरपंच गोरक्ष धोंडीबा ढोकले, राजाराम किसन जिते, मारुती ज्ञानेश्वर ढोकले, भगवान कोंडिबा थिटे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

करंदी (ता. शिरूर) येथे येथील पांडुरंग ढोकले यांच्या बिल्डींगच्या पाठीमागे काही इसम पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळत असल्याची माहिती शिक्रापूर निरीक्षक दिपरतन गायकवाड यांना मिळाली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पोलीस हवालदार रोहिदास पारखे, प्रतीक जगताप, सोमनाथ परभणे यांनी सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला असता त्यांना काही इसम गोलाकार बसून हातात पत्ते घेऊन पैसे टाकून पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळत असल्याचे पोलिसांना दिसले, दरम्यान पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या जवळील जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त केली, याबाबत पोलीस शिपाई प्रतीक भाऊसाहेब जगताप (वय ३२ वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरूर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी करंदीचे माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग आनंदराव ढोकले (वय ५९ वर्षे) गोरक्ष धोंडीबा ढोकले (वय ५७ वर्षे), राजाराम किसन जिते (वय ६३ वर्षे), मारुती ज्ञानेश्वर ढोकले (वय ५२ वर्षे) (सर्व रा. करंदी ता. शिरुर जि. पुणे), भगवान कोंडिबा थिटे (वय ६० वर्षे रा. पिंपळे जगताप ता. शिरुर जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार नरेंद्र गायकवाड करत आहे.

# पुरंदर उपसा सिंचन योजनेची अर्धवट कामे सहा महिन्यांत पूर्ण करणार जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची ग्वाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :-** पुरंदर तालुक्यातील जिरायती पट्ट्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या पुरंदर उपसा आणि जनाई उपसा जलसिंचन योजनांची सर्व प्रलंबित कामे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे. यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करणार असून, या भागातील शेतकऱ्यांना पुन्हा कधीही दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही, अशी भक्कम व्यवस्था सरकार करणार असल्याचे आश्वासन राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले. वाघापूर चौफुला येथे आयोजित शेतकरी संवाद बैठकीत ते बोलत होते.

वाघापूर चौफुला येथे पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी दौंडचे आमदार राहुल कुल, माजी आमदार संजय जगताप, अशोक टेकवडे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, गंगाराम जगदाळे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, संजय निगडे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत राऊत, संदीप फडतरे, गणेश जगताप यांसह भाजपचे जिल्हा व तालुक्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी, उमेदवार आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

यावेळी सविस्तर माहिती देताना नामदार विखे-पाटील म्हणाले की, पुरंदर उपसा योजना तातडीने सुरू करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा झाली असून येत्या २ ते ३ दिवसांत या योजनेतून पाणी सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



विशेष म्हणजे, ही योजना भविष्यात पूर्णपणे सौर ऊर्जेवर चालेल अशी व्यवस्था केली जाणार आहे, जेणेकरून विजेचा खर्च वाचून शेतकऱ्यांना शाश्वत फायदा होईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि निधी तळागाळातील सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता असणे आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी आगामी निवडणुकांमध्ये भाजपच्या उमेदवारांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहन केले.

नदी प्रदूषणाच्या मुद्द्यावर बोलताना विखे-पाटील यांनी स्पष्ट केले की, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांना सांडपाण्यावर प्रक्रिया केल्याशिवाय ते पाणी नदीत न सोडण्याच्या कडक सूचना दिल्या आहेत. यासोबतच नदीकाठावरील गावांमध्येही जलशुद्धीकरण प्रकल्प उभारले जाणार आहेत, जेणेकरून ग्रामीण भागातील पाण्याचे आरोग्य जपले जाईल.

यावेळी पी. एस. मेमाणे, कैलास कामथे, रवी फुले, गोरख खेडेकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी योजनांच्या दुरवस्थेबाबत मंत्र्यांकडे तक्रारी मांडल्या. योजना दुरुस्तीच्या नावाखाली सतत बंद असते. जलवाहिन्या फुटणे, एअर वॉल्व्ह खराब असणे आणि निवडणुकीपुरते पाणी सोडले जाणे यामुळे सर्व लाभक्षेत्राला पाणी मिळत नाही, अशा व्यथा शेतकऱ्यांनी मांडल्या. यावर विखे-पाटील यांनी येत्या २-३ दिवसांत पाणी सोडण्याचे आणि तांत्रिक कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आमदार राहुल कुल यांनी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मुळशीचे १० टीएमसी पाणी मुळा-मुठेत टाकल्यास त्याचा मोठा फायदा स्थानिक योजनांना होईल. रिंगरोड, पालखी मार्ग आणि जेजुरी विकास आराखड्यामुळे तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी आमदार संजय जगताप यांनी, पुरंदर-जनाई योजनेवरून सर्वसामान्यांची अडवणूक केली जाते. पाण्यासाठी कोणापुढे झुकावे लागू नये, यासाठी ही कामे पूर्ण होणे गरजेचे आहे. भाजपाच्या उच्चशिक्षित आणि जनतेतील उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

माजी आमदार अशोक टेकवडे यांनी, दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून तातडीने जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याची व नीरा-कऱ्हा नदीजोड प्रकल्प करण्याची मागणी त्यांनी केली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसमधून दत्तात्रय बडदे, अंबिका शिंदे, निलेश कुदळे, अमृत जाधव यांसह अनेकांनी आपल्या समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी जिल्हा परिषदेच्या उमेदवार दिव्या जगदाळे, अजय इंगळे तसेच पंचायत समिती उमेदवार ललिता कटके, देविदास कामथे, माऊली यादव, कैलास जगताप यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत संदीप कटके यांनी, प्रास्ताविक संभाजी काळाणे यांनी तर सूत्रसंचालन विकास इंदलकर यांनी केले तर महादेव शेंडकर यांनी आभार मानले. या संवाद बैठकीला परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश महासत्तेकडे वाटचाल करत आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये नागरिकांनी विकासाला साथ देत भाजपला मोठे यश दिले आहे. तोच इतिहास आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये घडवायचा आहे, असा विश्वास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. देशाच्या अर्थसंकल्पात युवक, महिला आणि शेतकऱ्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या असून भारतीय अर्थव्यवस्थेला आता नवी गती मिळाली असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

### शेतकऱ्यांची अडवणूक थांबवून हक्काचे पाणी द्या : संजय जगताप

पुरंदर आणि जनाई उपसा जलसिंचन योजना हा या भागातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. दुर्दैवाने, 'मत दिले तरच पाणी' अशी भूमिका घेऊन आजवर सर्वसामान्यांना वेठीस धरले गेले आहे. गावांचा डोंगराकडील भाग आणि नदीच्या दक्षिणेकडील भाग आजही पाण्यापासून वंचित आहे. हे राजकारण थांबवून वंचित भागापर्यंत जलवाहिनी नेणे आणि अर्धवट कामे पूर्ण करणे ही काळाची गरज आहे. केंद्र आणि राज्यात भाजपची सत्ता असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून भाजपा पुरंदरचा शेतकरी सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे

## शिक्रापूरचा कचरा सणसवाडी ग्रामपंचायतीच्या दारी

### शिक्रापूरचा कचरा प्रश्न वेगळ्या मार्गावर जाण्याची चिन्हे



सणसवाडी (ता. शिरुर) ग्रामपंचायत कार्यालय पुढे टाकण्यात आलेला कचरा.

सणसवाडी ग्रामपंचायत कार्यालय पुढे टाकण्यात आलेला कचरा उचलण्यात आलेला असून याबाबत सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी संतोष गायकवाड यांनी सांगितले.

सणसवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालय समोर टाकलेल्या कचऱ्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार दिल्यास आपण गुन्हा दाखल करणार असल्याचे शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी सांगितले.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील गावचा कचरा प्रश्न ग्रामपंचायतच्या वतीने सणसवाडी औद्योगिक वसाहतीमध्ये भाड्याने घेतलेल्या गोडाऊन मध्ये ठेवून पुणे महानगरपालिकेकडे पाठविला जात असताना सध्या त्या गोडावूनला विरोध होत असल्याने माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्या स्नेहल भुजबळ यांचे पती उद्योजक राजेश भुजबळ यांनी थेट कचरा गाड्या ग्रामपंचायत समोर खाली केल्याने खळबळ उडाली असल्याने शिक्रापूरचा कचरा प्रश्न वेगळ्या वळणावर जाण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

शिक्रापूर (ता. शिरूर) ग्रामपंचायत हद्दीतील सर्व कचरा संकलित करून सणसवाडी येथील औद्योगिक वसाहत मध्ये ग्रामपंचायत ने भाडेतत्त्वावर घेतलेल्या एका गोडाऊन मध्ये साठवून त्याचे ओला व सुखा कचरा असे वर्गीकरण करुन कचरा पुढील प्रक्रियेसाठी पुणे महानगरपालिकेकडे पाठविला जात असल्याची उपाययोजना काही वर्षांपासून सुरू आहे, मात्र सध्या परिसरात दुर्गंधी पसरुन नागरिकाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवत माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्या स्नेहल भुजबळ यांचे पती उद्योजक राजेश भुजबळ यांनी तहसीलदार व पंचायत समितीसह शिक्रापूर व सणसवाडी ग्रामपंचायतकडे तक्रार करत सदर कचऱ्यावर तात्काळ कार्यवाही करुन कचरा साठवणूक केंद्र तात्काळ बंद करावे तसेच कचऱ्यावर उपायोजना केली नाही तर भविष्यात सदर कचरा स्वखर्चाने उचलून सणसवाडी ग्रामपंचायत पुढे आणून टाकणार असल्याचे देखील निवेदन ग्रामपंचायतला दिलेले असताना अखेर मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी राजेश भुजबळ यांनी थेट कचरा गाड्या ग्रामपंचायत कार्यालय पुढे नेऊन खाली केल्याने खळबळ उडाली दरम्यान स्थानिकांनी ग्रामपंचायतपुढे मोठी गर्दी करत आक्रमक भूमिका घेतल्याने पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली, तर सदर कचरा नेमका कोणत्या दिशेला जाणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## श्रीमद् भागवत कथामृत सप्ताहाचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** त्रिकाल संध्या प्रचार संघटनेचा पुढाकार; पंडित डॉ. काशिनाथ मिश्रा यांचे कथाकथन शिरूर शहरात भक्ती, संस्कार व अध्यात्मिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्रिकाल संध्या प्रचार संघटनेच्या वतीने श्रीमद् भागवत कथामृत सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक उपक्रम दि. ३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शिरूर नगरपरिषद मंगल कार्यालय, शिरूर बसस्थानकाजवळ दररोज सायंकाळी ४.३० ते रात्री ८.०० या वेळेत होणार आहे.

या कथामृताचे कथाकथन सुप्रसिद्ध भागवताचार्य पंडित डॉ. काशिनाथ मिश्रा करणार असून त्यांच्या ओघवत्या, अभ्यासपूर्ण व प्रभावी वाणीमधून श्रीमद् भागवताचा अमृतरस भाविकांना अनुभवता येणार आहे.

या सात दिवसीय सप्ताहात प्रभू श्री जगन्नाथ कलशयात्रा, प्रभात फेरी, हरीनाम संकीर्तन, शंखनाद, त्रिकाल संध्या, प्रभू श्री जगन्नाथ पूजा, श्रीमद् भागवत पठण तसेच महाप्रसाद अशा विविध भक्तीमय व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना पंडित डॉ. काशिनाथ मिश्रा म्हणाले की, भारत ही देवभूमी आहे. धर्म ही समाजाला योग्य दिशा देणारी महान शक्ती आहे. अनेक संकटांवर मात करूनही सनातन धर्म आजही टिकून आहे. ही आध्यात्मिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने विश्व सनातन संस्थेच्या माध्यमातून भागवत कथा घरोघरी पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या पत्रकार परिषदेस आशा बारणे, दिलिप बारणे, अजिनाथ मालसुरे राजेंद्र डोंगरे, अशोक भोसले, महेंद्र परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने शिरूर शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कथामृताचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिरूरमध्ये सात दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे शहरात भक्ती, अध्यात्म व संस्कारांची अनुभूती निर्माण होणार असून भाविकांसाठी हा सप्ताह पर्वणीसारखा उत्सव ठरणार आहे.

## जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०२६

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीकरिता मतदार यादीतील मतदाराचे नाव तसेच मतदान केंद्र शोधण्याकरिता 'मताधिकार' मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे; अधिकाधिक मतदारांनी या ॲपचा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांकरिता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. याकरिता मतदाराचे नाव व मतदान केंद्र शोधण्याकरिता 'मताधिकार' मोबाईल ॲप 'गुगल प्ले स्टोअर' वरुन डाऊनलोड करता येईल. या ॲपमध्ये मतदाराचे नाव शोधण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार मतदाराचे संपूर्ण नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (EPIC) क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव शोधता येते. ॲपच्या माध्यमातून आपले मतदान केंद्रही शोधता येणार आहे. याशिवाय मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://mahasecvotelist.in/ हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करुन देण्यात आले आहे, त्यातील ड्शरअॅलह छराश ळप तींशअ ड्ळीीं वर क्लिक करून मोबाईल ॲपप्रमाणेच 'नाव' किंवा 'मतदार ओळखपत्रा'चा (EPIC) क्रमांक नमूद करुन नाव शोधता येईल, अशी माहिती श्री. डुडी यांनी दिली आहे.




**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की अनिल हरिभाऊ कुलकर्णी राहणार फ्लॅट नंबर ७, दर्शन रेसिडेन्सी, सुदर्शन नगर, चिंचवड, पुणे-४११०३३ यांचे दिनांक २२/०६/२०१६ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेले चार चाकी वाहन नंबर MH14DA8564 असा असून त्याचा चासीस नंबर MA3EADE1S00291827 व इंजिन नंबर K10BN7103926 असा असून, सदर वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार श्रीमती अनिता अनिल कुलकर्णी यांच्या नावावर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून, सदरच्या वाहनाचे अस्सल कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, सात दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही, असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दि. ०६/०२/२०२६
श्रीमती अनिता अनिल कुलकर्णी
फ्लॅट नंबर ७, दर्शन रेसिडेन्सी,
सुदर्शन नगर, चिंचवड, पुणे - ४११०३३
मो.९९२३००९५३२

## लाळ खुरकत रोगाच्या निर्मुलनासाठी लसीकरण हाय प्रभावी उपाय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :-** लाळ खुरकत रोग हा गाय, म्हैस, शेळी व मेंढ्यांमधील अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य रोग असून त्याचा पशुधन उत्पादन व निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होतो. या रोगाच्या नियंत्रण व निर्मूलनासाठी केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २०३० पर्यंत लसीकरणाद्वारे लाळ खुरकत व सांसर्गिक गर्भपात हे दोन रोग निर्मूलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

राज्यात १४ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लाळ खुरकत लसीकरण फेरी-७ यशस्वीपणे पार पडली असून १५९ लक्ष गो व म्हैस वर्गीय पशुधनांपैकी १५३ लक्ष पशुधनांना लसीकरण करण्यात आले आहे. लाळ खुरकत रोगाचे संपूर्ण निर्मूलन होण्यासाठी दर सहा महिन्यांनी लसीकरण करणे आवश्यक आहे.

त्यानुसार १३ फेब्रुवारी ते २९ मार्च २०२६ या कालावधीत लाळ खुरकत लसीकरण फेरी-८ राबविण्यात येणार असून आवश्यक लस व साधनसामग्रीचा पुरवठा केंद्र शासनामार्फत करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या मानक कार्यप्रणालीनुसार पंचायती राज संस्था, शहरी स्थानिक संस्था, सहकारी दुग्ध संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी पशुवैद्यक व पशुपालकांच्या सक्रिय सहभागातून ही मोहिम राबविण्यात येणार आहे. पशुंचे आरोग्य जपण्यासाठी, रोगप्रसार रोखण्यासाठी व पशुपालकांचे संभाव्य आर्थिक नुकसान टाळण्यासाठी सर्व पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधून आपल्या गो व म्हैस वर्गीय पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. आणि आयुक्त पशुसंवर्धन डॉ.

## होलार समाजाच्या वतीने शोकसभा दादांच्या जुन्या आठवणींना दिला उजाळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्रभरात शोककळा पसरला आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नगरसेवक गोरख पारसे तसेच होलार समाजाच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज मंदीर या ठिकाणी शोकसभा आयोजित करण्यात आली होती.याप्रसंगी त्यांच्या शिस्तबद्ध आणि धडाडीच्या कार्याची आठवण काढत शोकसभेमध्ये समाज बांधव,कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहून त्यांच्या कार्याचे स्मरण करत अश्रुपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर सामाजिक राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून



श्रद्धांजली अर्पित करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.यामध्ये होलार समाजाचे राष्ट्रीय नेते माणिकराव भंडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अँड किरण इंगळे, पत्रकार सुरज देवकाते, होलार समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष निवृत्ती गोरे, बाळासाहेब देवकाते, बाळासाहेब जाधव, बळवंत माने, ॲड. धीरज लालाबिगे, हिरामण माने, विष्णुपंत चव्हाण, गोरेताई, ढोबळे सर तसेच अनेकांनी आपल्या मनोगतातून अजित दादांविषयी प्रेम व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

## इंद्रायणी प्रदूषणमुक्तीसाठी ठोस कृती आराखडा आवश्यक : नगराध्यक्ष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** इंद्रायणी नदीचा प्रश्न हा आळंदीकरांच्या श्रद्धा, परंपरा व दैनंदिन जीवनाशी अतूटपणे जोडलेला असून, नदी स्वच्छतेसाठी तातडीच्या उपाययोजनांसह दीर्घकालीन व शाश्वत आराखडा राबविणे आवश्यक आहे. या संदर्भात राज्य शासनाकडे सातत्याने ठोस पाठपुरावा केला जाईल, अशी भूमिका नगराध्यक्ष प्रशांत पोपट कुऱ्हाडे यांनी मांडली. इंद्रायणीतील वाढते प्रदूषण ही गंभीर बाब असून, प्रशासनासह लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सामूहिक सहभागातूनच नदीला पुन्हा निर्मळ स्वरूप प्राप्त करून देता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

इंद्रायणी नदी स्वच्छ, निर्मळ व प्रदूषणमुक्त राखण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्याच्या उद्देशाने आळंदी नगरपरिषदेची विशेष सभा मंगळवारी नगरपरिषद सभागृहात पार पडली. या सभेला आळंदी देवस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे व विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील उपस्थित होते. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षा, मुख्याधिकारी यांच्यासह एकूण २० नगरसेवक व नगरसेविका सभेला उपस्थित होते. यावेळी देवस्थानच्या प्रमुख विश्वस्तपदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ.भावार्थ देखणे यांचा नगरपरिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सभेत आळंदी येथील इंद्रायणी नदी स्वच्छतेबाबत विविध उपाययोजना या विषयावर सविस्तर चर्चा झाली. नगरसेविका पूजा घुंडरे यांनी नदी घाटावर महिलांसाठी चेंजिंग रूमची सुविधा, सुरक्षा रक्षकांची नेमणूक तसेच कचरा टाकण्यास प्रतिबंध करण्याची मागणी केली. नगरसेवक हेमंत कुऱ्हाडे यांनी औद्योगिक सांडपाण्यावर कायमस्वरूपी बंदी घालण्याची सूचना केली. शहरातील एसटीपी प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालवून कुंड स्वच्छतेवर भर देण्याची भूमिका नगरसेविका वैजयंता उमरगेकर, नगरसेवक सुरेश झोंबाडे व सोमनाथ कुऱ्हाडे यांनी मांडली.

विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे यांनी फुलविक्रेत्यांवर नियंत्रण, जलपर्णी निर्मूलन तसेच अस्थी विसर्जन व दशक्रिया विधीसाठी स्वतंत्र जागा निश्चित करण्याचा प्रस्ताव मांडला. नगरसेविका ऋतुजा घुंडरे यांनी आठवड्यातून एकदा प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या संयुक्त श्रमदानाची सूचना केली. गटनेते सचिन गिलबिले यांनी घाटावरील सुरक्षितता, पूर्णवेळ सफाई कर्मचारी व सर्व ठिकाणी एसटीपी प्रकल्प उभारण्याची गरज अधोरेखित केली.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी आतापर्यंत झालेल्या कामांचा आढावा सादर करत नागरिक व देवस्थानने स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी नगरपरिषदेला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. सर्व घटकांच्या समन्वयातूनच इंद्रायणी नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवणे शक्य होईल, असा निष्कर्ष सभेत काढण्यात आला.

## आंबळेत ऊसाच्याफडात पुन्हा आढळले बिबट्याचे तीन बछडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** आंबळे (ता. शिरुर) येथील शेतात दोन दिवसांपूर्वी ऊस तोड सुरु असतानाबिबट्याचे दोन बछडे आढळून आल्यानंतर वनविभागाच्या वतीने सदर बिबट्याच्या बछड्यांचेआईशी पुनर्मिलन घडवण्यात आले असताना आता पुन्हा सदर ठिकाणी बिबट्याचे तीन बछडेआढळून आले आहे.

आंबळे (ता. शिरुर) येथील प्रकाश बेंद्रे यांच्या शेतात दोन दिवसांपूर्वी ऊस तोड सुरु असताना बिबट्याचे दोन बछडे आढळून आले होते, त्यानंतर नुकतेच सदर शेतात पुन्हा ऊसतोड सुरु असताना ऊसतोड कामगारांना ऊसाच्या फडात तीन बिबट्याचे बछडे दिसल्याने खळबळ उडाली याबाबतची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे व वनपरिमंडल अधिकारी भानुदास शिंदे यांना मिळताच नियतक्षेत्र वनअधिकारी गणेश झिरपे,निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व वनविभाग रेस्क्यू टीमचे सदस्य शेरखान शेख, वैभव निकाळजे, नेचर गार्ड ऑर्गनायझेशन संस्थेचे अध्यक्ष गणेश टिळेकर, सचिव शुभांगी टिळेकर यांनी सदर ठिकाणी धाव घेत प्रकाश बेंद्रे, विकास उकले, मुकुंद भिवरे, शशिकांत संकपाळ आदींच्या उपस्थितीत बिबट्याच्या तीनही बछड्यांना ताब्यात घेत उपस्थित शेतकरी व नागरिकांना योग्य माहिती देत सदर बिबट्याच्या बछड्यांना त्यांच्या आईच्या पुनर्मिलन साठी शेतात सुरक्षित ठेवले असून परिसरात शेतकऱ्यांनी शेतात काम करताना काळजी घ्यावी व रात्रीच्या वेळी शेतात फिरू नये असे आवाहन वनविभागाच्या वतीनेकरण्यात आले आहे.



आंबळे (ता. शिरुर) येथे ऊसाच्या फडात आढळलेले बिबट्याचे तीन बछडे ताब्यात घेताना पथक.**(छायाचित्र आकाश भोरडे)**

द•ख•ल

# कोल्हारजवळ मालट्रक-दुचाकीची भीषण धडक; दोघे जागीच ठार

**कोल्हार :** येथील चिंचोली शिवारालगत असलेल्या श्री साईबाबा मंदिराजवळ गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मालट्रक व दुचाकी यांच्यात समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दोघे जण जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मालट्रक (क्रमांक ढछ-३०-उऋ-१३०५) हा नगरकडून शिर्डीकडे जात असताना, कोल्हारकडून राहुरीकडे जाणारी दुचाकी (क्रमांक चक-१७-ू अ-४६४८) श्री साईबाबा मंदिराजवळ आली. याच ठिकाणी दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की दुचाकीचा चक्काचूर झाला आणि दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतांना तातडीने लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. मृतांची ओळख अद्याप पटलेली नसून, त्यांच्या नातेवाइकांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.



# शेडगावच्या शुभांगी मस्के यांचा ना. विखे यांच्या हस्ते सन्मान

**श्रीगोंदा प्रतिनिधी :** तालुक्यातील शेडगाव येथील शुभांगी एकनाथ मस्के यांनी शेती क्षेत्रात महिलांना एकत्र आणत केलेल्या नावीन्यपूर्ण व प्रेरणादायी कार्याची दखल घेत जागतिक महिला वर्षानिमित्त अहिल्यानगर येथे राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण



विखे पाटील यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव येथील शुभांगी मस्के यांनी राजनंदिनी महिला बचत गटा'च्या माध्यमातून ५० महिलांचे संघटन उभे करून शेती शाळा प्रशिक्षण, नैसर्गिक शेती, कमी खर्चातील शेती पद्धती स्वतः प्रयोग करत इतर महिला शेतकरी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत.ना. राधाकृष्ण विखे यांनी यावेळी बोलताना महिलांचे संघटन आणि शेतीतील प्रयोगशीलता ही ग्रामीण विकासाची खरी ताकद आहे, असे सांगत शुभांगी मस्के यांच्या कार्याचे कौतुक केले.

# श्रीराम मंदिरात नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथिल श्रीराम मंदिरात आश्वी बुद्रुक, आश्वी खुर्द व उंबरी, कनोली,मनोली ओझर,निमगावजाळी सराफ सुवर्णकार संघटना, महिला मंडळ व समाज बांधव यांच्या वतीने बुधवारी उत्साही वातावरणात श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आश्वीसह पंचक्रोशीतील गावानमधील सुवर्णकार समाज बाधंव व महिलाच्या वतीने येथिल श्रीराम मंदिरात पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व अभिवादन केले. यावेळी महाआरतीनंतर आश्वी बुद्रुक व आश्वी खुर्द गावातुन भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी हभंप बाळासाहेब महाराज उंबरकर यांनी श्री संत नरहरी महाराज यांच्या जीवनावर सुश्राव्य असे अमृततुल्य प्रवचन केले.

# संभाजी ब्रिगेड श्रीगोंदा शहराध्यक्षपदी अक्षय दहातोंडे

**लिंपणगाव :** संभाजी ब्रिगेड संपर्क कार्यालय येथे श्रीगोंदा शहरातील अनेक तरुणांनी संभाजी ब्रिगेड पक्षात उत्स्फूर्तपणे प्रवेश केला.



संभाजी ब्रिगेडच्या कार्याने प्रेरित होऊन दहातोंडे अक्षय बाळकृष्ण, दहातोंडे विजय जालिंदर, दहातोंडे अजय जालिंदर, दहातोंडे आशिष राजेंद्र, सप्रे रुषीकेश विजय, दहातोंडे महेश राजेंद्र, सुपेकर संकेत छोडिवा, घोडके प्रतीक वसंत या तरुणांनी पक्षात प्रवेश केला.

यावेळी अक्षय दहातोंडे यांची संभाजी ब्रिगेड श्रीगोंदा शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमात बोलताना तालुका उपाध्यक्ष दिलीप लबडे यांनी तरुणांना संभाजी ब्रिगेडच्या विचारांची आज नितांत गरज असून सशक्त समाज निर्मितीसाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

# अतिक्रमण धारकांनी घेतला आयुक्तांचा धसका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मध्य शहरातील गजबजलेल्या आशा टॉकीज चौक, कोतवाली पोलिस स्टेशन ते माणिक चौकापर्यंतच्या अतिक्रमणांवर बुधवारी महापालिकेने हातोडा टाकला. तर गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा, एसटी स्टँड परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. दुसर्या दिवशीही आयुक्त रस्त्यावर उतरले होते.



महापालिकेच्या पथकाने बुधवारी आशा टॉकीज चौकातील अतिक्रमणांवर कारवाई केली. यात १५० अतिक्रमणे हटविण्यात आली. गुरुवारी आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटाव मोहिमेला छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरुवात झाली.

अतिक्रमित असलेल्या हातगाड्या, टपर्या मटक्याचे शेड हटविण्यात आले. यावेळी उप अभियंता सुरेश इथापे, अतिक्रमण प्रमुख आदित्य बल्लाळ, क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे, क्षेत्रीय अधिकारी शेख रिजवान, अतिक्रमण पथक उपस्थित होते. माळीवाडा व एसटी स्टॅड परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आल्याने परिसरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला, अन् वाहतूक सुरळीत झाली.

# जामखेड शहर अतिक्रमणाच्या विळख्यात; विकासकामे ठप्प

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** शहरातून जाणाऱ्या जामखेड–सौताडा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८–डी या रस्त्याच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी १५ मीटर (५० फूट) शासकीय हद्द निश्चित करण्यात आली आहे. मात्र या हद्दीत मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य व अनधिकृत बांधकामे झाल्याने शहराच्या विकासकामांमध्ये गंभीर अडथळे निर्माण होत असून शहराचा सर्वांगीण विकास खुंटल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी व्यक्त केले आहे.

राष्ट्रीय महामार्गालगत नगरपरिषद हद्दीत दोन्ही बाजूस सुमारे दहा फूट जागा नगरपरिषदेच्या मालकीची असून ही जागा भुयारी गटार, सार्वजनिक पाणीपुरवठा योजना व फुटपाथसाठी राखीव आहे. मात्र सद्यस्थितीत या जागेत पक्की बांधकामे करण्यात आली आहेत. दरम्यान, भुयारी गटार व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेसाठी नगरपालिकेला सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर असून कामे सुरू आहेत; परंतु अतिक्रमण हटविल्याशिवाय ही कामे पूर्ण होणे अशक्य आहे. तसेच ही मूलभूत कामे पूर्ण झाल्याशिवाय शहरातील अंतर्गत विकासकामांनाही गती देता येणार नाही. तसेच अतिक्रमणे वाचविण्याच्या हेतूने 'जिओ टॅगिंग'च्या गोंडस नावाखाली रोड सेंटर सरकविल्याने गटाराचे कामही विस्कळीत व वेडे वाकडे झाल्याचे निदर्शनास येत असल्याने कोठारी पेट्रोल पंप ते नवले पेट्रोल पंपापर्यंत दोन्ही बाजूंच्या जागांचे उतारे व खरेदी खतानुसार पाहणी करून संबंधित अतिक्रमणे तात्काळ हटवावीत,अशी मागणी पवार यांनी केली आहे.

सदर अतिक्रमणांमुळे शहराचा विकास रखडला असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पवार यांनी दिला आहे.

# तीन कृषी केंद्रांचे परवाने निलंबित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा प्रतिनिधी :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या तोंडी तक्रारी अखेर प्रशासनाच्या कानावर गेल्या आणि कृती झाली. श्रीगोंदा तालुक्यातील तीन कृषी सेवा केंद्रांवर मोठी कारवाई करत परवाने निलंबित करण्यात आले आहेत. खत, बियाणे व कीटकनाशकांच्या विक्रीत नियमभंग आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली असून, त्यामुळे तालुक्यातील कृषी दुकानदारांमध्ये खळबळ उडाली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अनेक तोंडी तक्रारी तालुका कृषी तसेच जिल्हा कृषी कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानुसार खते , बियाणे व कीटकनाशकांच्या विक्रीत नियमभंग झाल्याच्या तक्रारी मिळाल्या होत्या त्यानुसार तालुका कृषी गुण नियंत्रण अधिकारी शितल आरु यांनी संबंधित कृषी सेवा केंद्रांची तपासणी करून सविस्तर अहवाल सादर केला. या अहवालाच्या आधारे कृषी परवाना अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अहिल्यानगर श्री. सुधाकर बोराळे यांनी परवाने निलंबित करण्याची कडक कारवाई केली.यामध्ये भैरवनाथ कृषी सेवा केंद्र काष्टी यांचा रासायनिक खताचा परवाना १ वर्षासाठी निलंबित करण्यात आला आहे तसेच स्वप्नील अॅग्रो एजन्सी, ढवळगाव बियाण्यांचा परवाना १ महिन्यासाठी निलंबित कीटकनाशकांचा परवाना १ महिन्यासाठी निलंबित रासायनिक खताचा परवाना १ वर्षासाठी निलंबित करण्यात आला आहे तसेच कृष्णा कृषी सेवा केंद्र, देवदैठण –कीटकनाशकांचा परवाना १ वर्षासाठी निलंबित,रासायनिक खतांचा परवाना १ वर्षासाठी निलंबित, बियाण्यांचा परवाना १ वर्षासाठी निलंबित करण्यात आला आहे .

**शेतकऱ्यांची मागणी**

शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या खत, बियाणे आणि औषधात गडबड म्हणजे थेट पिकावर घाव, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. एकीकडे वाढता उत्पादन खर्च, तर दुसरीकडे निकृष्ट साहित्य यामुळे शेतकरी पुरता मेटाकुटीला येत असल्याचा आरोप होत आहे.त्यामुळे यांचेवर कडक कारवाई करण्याची मागणी होताना दसत आहे.

**आता हे प्रश्न उरतोच**

झालेली ही कारवाई काही निवडक दुकानांपुरतीच राहणार की तालुकाभरातील सर्व कृषी दुकानांची सखोल तपासणी होणार का ? दोषी दुकानावर कारवाई झाली, पण पुन्हा तेच धंदे सुरू होणार नाहीत ना? शेतकरी आता केवळ कारवाई नव्हे, तर सततचा वचक अपेक्षित ठेवून आहेत.

# टास्क पूर्ण करण्याच्या नावाखाली शिक्षिकेची साडेपाच लाखांची फसवणूक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** गुगलवर लिंकला रेटिंग देऊन नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी एका शिक्षिकेला तब्बल ५ लाख ४५ हजार ९६८ रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आगरकर मळा परिसरात राहणार्या ३९ वर्षीय शिक्षिकेला टेलिग्राम आयडीवरून संपर्क करण्यात आला होता. आरोपींनी त्यांना गुगलवर लिंकला रेटिंग देण्याचे टास्क दिले आणि त्यातून मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवले. सुरुवातीला विश्वास संपादन केल्यानंतर, टास्कमधून बाहेर पडण्यासाठी काही स्टेप्स फॉलो करण्यास सांगण्यात आले. मात्र, या स्टेप्स चुकीच्या असल्याचे सांगून तांत्रिक कारणास्तव टेलिग्राम ग्रुपमधील सदस्यांची बँक खाती फ्रीज झाल्याची भीती आरोपींनी दाखवली.

फ्रीज झालेली खाती पुन्हा सुरू करण्यासाठी आणि गुंतवलेले पैसे परत मिळवण्यासाठी फिर्यादीला आणखी पैसे भरण्यास भाग पाडले गेले. अशा प्रकारे वेळोवेळी एकूण ५ लाख ४५ हजार ९६८ रुपये भरून घेऊन त्यांची फसवणूक करण्यात आली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी टेलिग्राम आयडी धारक आणि संबंधित बँक खातेधारकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी अशा कोणत्याही अनोळखी लिंक किंवा टास्कला बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# महिलेचे दागिने लुटणारा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** शहराजवळील स्टेशन रोड परिसरात एका महिलेला धारदार शस्त्राचा धाक दाखवून गळ्यातील दागिने हिसकावून नेणाऱ्या आरोपीस अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे.



या घटनेची हकीकत अशी की, दि. २९ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी गोदाबाई बापुराव दळवी (रा. स्टेशन रोड, दळवी वस्ती, श्रीगोंदा) या शेतात शेळ्या चारत असताना दोन अनोळखी इसमांनी बोकड खरेदी करण्याच्या बहाण्याने त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर धारदार शस्त्र लावून त्यांच्या गळ्यातील सुमारे ७५ हजार रुपये किमतीचे दोन तोळे वजनाचे सोन्याचे डोरले व मनीमंगळसूत्र हिसकावून आरोपी पसार झाले.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करून तपास सुरू करण्यात आला.

गुप्त बातमीदाराच्या माहितीच्या आधारे चोराचीवाडी येथील जाक्या उर्फ बगदास काळे (वय ४२) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदार ओंकार शक्ती काळे याच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली.

आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. ताब्यातील आरोपीस पुढील तपासासाठी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# गौतम पॉलिटेक्निक व निलय ग्रुपमध्ये सामंजस्य करार




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट आणि नाशिक येथील जागतिक दर्जाची कंपनी निलय ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात करण्यात आला आहे. यामुळे गौतम पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होणार असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य वसीम शेख यांनी सांगितले आहे.

या करारामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाचे धडे गिरवण्यासोबतच रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. निलय ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज ही कंपनी इलेक्ट्रिकल पॅनल निर्मिती आणि सीएनसी ऑपरेशन्समध्ये जागतिक स्तरावर कार्यरत आहे. या करारातून तृतीय वर्षाच्या पात्र विद्यार्थ्यांना नोकरी मध्ये प्राधान्य देण्यात येणार असून द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना तीन महिने इंडस्ट्रियल ट्रेनिंग दिली जाणार आहे. जागतिक स्तरावरील प्रगत तंत्रज्ञान याबाबत विद्यार्थ्यांना अपडेट करण्यासाठी कंपनीच्या तज्ञ मंडळींकडून गौतम पॉलीटेक्निकच्या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना टिकण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी मोठी संधी संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हा सामंजस्य करार झाल्यामुळे गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिटयूटच्या मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कंपनीत जाऊन इंडस्ट्रियल व्हिजिट करता येणार आहे. तसेच शिक्षण पूर्ण झाल्यानंतर याच कंपनीत थेट नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. सध्या उद्योग क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील इलेक्ट्रिकल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरिंग व सीएनसी ऑपरेशन प्रोडक्शन आणि मेंटेनन्स क्षेत्रामध्ये मध्ये गौतम पॉलीटेक्निकचे विद्यार्थी पुढे असतील असा विश्वास प्राचार्य वासिम शेख यांनी व्यक्त केला. यावेळी संस्थेचे इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे, कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर सागर गिरासे, कार्यालयीन अधीक्षक अण्णासाहेब बढे, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# संत नरहरी महाराज मंदिर प्रांगणातील नियोजित सभामंडपाचे भूमिपूजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रस्त्यावर असलेल्या संत शिरोमणी श्री नरहरी महाराज मंदिर प्रांगणातील नियोजित सभामंडपाचे भूमिपूजन सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते व आ. विठ्ठल लंघे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या भक्तिभावात पार पडले. नेवासा तीर्थक्षेत्राच्या वैभवात भर घालणाऱ्या या सभामंडपासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार लंघे पाटील यांनी यावेळी दिली.




यावेळी व्यासपीठावर रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव, हरी महाराज भोगे, पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख उद्योजक प्रभाकरराव शिंदे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, शिवसेनेचे भाऊसाहेब वाघ, भाजपचे रामभाऊ खंडाळे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, देवस्थान ट्रस्टचे विजय दहिवाळकर, सुवर्णकार समाज संघटनेचे बालेंद्र पोतदार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आलेल्या संत-महंत व मान्यवरांचे स्वागत सोहळा कमिटीचे मार्गदर्शक ज्येष्ठ पत्रकार अशोकराव डहाळे यांनी केले. नगरसेवक निरंजन डहाळे यांनी प्रास्ताविकात वर्षभर चालणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांसाठी सभामंडपाची नितांत गरज असल्याचे स्पष्ट केले. संत नरहरी महाराज देवस्थान व सुवर्णकार समाज संघटनेच्या वतीने संतपूजन व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. आ. लंघे म्हणाले, तालुक्यातील विकासकामे करताना सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याची आपली भूमिका आहे.

# पोहण्यासाठी गेलेल्या १७ वर्षीय मुलाचा विहिरीत बुडुन मृत्यु

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील धानोरा या ठिकाणी आपल्या नातेवाईकडे आलेल्या आवेज रिजवान पठाण वय १७ वर्षे या मुलाचा विहिरीतील पाण्यात बडुन मृत्यू झाला. आवेज हा आज सकाळी मित्रांसोबत विहिरीवर पोहण्यासाठी गेला होता या वेळी ही दुर्घटना घडली. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की मयत आवेज रिजवान पठाण वय १७ वर्षे रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर हा काल दि ४ रोजी जामखेड तालुक्यातील धानोरा या ठिकाणी मामेबहीणीच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त आला होता. रात्री वाढदिवस झाल्या नंतर आवेद हा त्याचा चुलत भाऊ व मित्र त्या रात्री मुक्कामासाठी धानोरा या ठिकाणी आपल्या नातेवाईकडे थांबले होते. यानंतर दुसर्या दिवशी गुरवार दि ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या आसपास आवेद हा आपला चुलत भाऊ अन्वर शौकत पठाण व जय संतोष आरु असे तिघे धानोरा येथिल घराजवळील विहिरीवर पोहायला गेले होते.

यावेळी मयत आवेज याचा चुलभाऊ व मित्र हे विहिरीमध्ये पोहुन वरती आले होते. यावेळी आवेज हा त्यांना म्हणाला की मला पण पोहता येते असे म्हणुन विहीरीत उडी मारली. मात्र विहीरीत उडी मारल्या नंतर आवेज हा पाण्याच्या वरती आला नाही, म्हणून त्याचा चुलत भाऊ व मित्र या दोघांनी मोठ्याने आरडाओरड केला. यावेळी आवाज एकुण वस्तीवरील नातेवाईकांनी विहिरीकडे धाव घेतली. यानंतर पोलीस पाटील योगिनाथ जायभाय यांना फोन डरे माहिती दिली. यानंतर पोलीस पाटील यांनी ही घटना जामखेड पोलीस स्टेशन व महसूल विभागास कळवली.

पिंपरखेड येथील रफीक अब्बास सय्यद वय ५४ यांनी २३ फुट खोल पाण्यात बुडी घेऊन अवेज याचा मृतदेह पाण्याच्या वरती काढला. सकाळी आठ वाजता बुडालेल्या आवेजचा मृतदेह दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बाज पाण्यात उलटी टाकुन त्यावर मृतदेह ठेऊन दोरीच्या सहाय्याने मृदतेह पाण्यातुन विहिरीच्या बाहेर म्हणजे तब्बल सहा तासांनी बाहेर काढण्यात आला.

यावेळी मृतदेह काढण्यासाठी त्यांना घटनास्थळी वाजिद पठाण, हरीदास शिरगिरे, माजी सरपंच बालाजी शिंदे, भाऊराव काळे, लाला शिंदे, बाबुराव वाघ, सिकंदर शेख, सलीम शेख यांनी त्यांना मदत केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक पुष्कर कडु स. पो. उपनिरीक्षक सलिम शेख, पो. कॉ. जितेंद्र सरोदे, योगेश दळवी, मंडल अधिकारी विजय चव्हाण, पोलीस पाटील योगिनाथ जायभाय, यांनी घटनास्थळी धाव घेत मदत केली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. या प्रकरणी निजाम गणी शेख, रा. धानोरा यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या खबरी वरुन अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# स्वातंत्र्यकाळापासून बंद असलेला ढोरजळगाव - तेलकुडगाव शिवरस्ता अखेर खुला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** तालुक्यातील ढोरजळगाव व नेवासा तालुक्यातील तेलकुडगाव या दोन गावांच्या सीमेवरील तालुकास्तरीय शिवरस्ता तब्बल स्वातंत्र्यकाळापासून बंद अवस्थेत होता. अंदाजे ३.५ ते ४ किलोमीटर लांबीच्या या रस्त्यामुळे दोन्ही गावांतील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

गेल्या चार ते पाच वर्षांपासून हा रस्ता खुला करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू होते; मात्र तांत्रिक अडचणी तसेच काही शेतकऱ्यांचा विरोध यामुळे हे प्रयत्न वारंवार अयशस्वी ठरत होते.

अखेर महसूल विभागाने ठोस पावले उचलत भूमी अभिलेख विभाग व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने सर्व अडथळ्यांवर मात केली. केवळ चार दिवसांच्या कालावधीत सदर शिवरस्ता पूर्णपणे खुला करण्यात आला. या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला



प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.

या शिवरस्त्याच्या खुल्यामुळे ढोरजळगाव व तेलकुडगाव परिसरातील अंदाजे २०० ते २५० शेतकरी कुटुंबांना थेट लाभ होणार आहे. शेतीकामासाठी शेतात जाणे-येणे, शेतीमालाची वाहतूक तसेच दैनंदिन दळणवळण आता अधिक सोयीचे होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था अधिक बळकट होईल.सदर रस्ता खुला केल्याबद्दल परिसरातील शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत असून, महसूल विभागासह संबंधित सर्व प्रशासनिक यंत्रणांचे मनःपूर्वक आभार मानले जात आहेत. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेला हा शिवरस्ता खुला झाल्याने परिसरातील विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.०६ फेब्रुवारी २०२६ | अहमदनगर | पान नं. ८


# भगवान श्रीविष्णूंचे स्त्रीरुप दर्शन-नेवासे नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज




**पुरातन काळी दानवांनी स्वर्गावर स्वारी करून देवदेवतांना सळो की पळो करून सोडले. तेंव्हा देवदेवतांनी भूतलावर सुरक्षित असे ठिकाण निवडले.ते ठिकाण म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र नेवासे होय. देवादिकांबरोबर त्यांचे खजिनदार कुबेर ही नेवासे येथे आले. त्यावरुन नेवाशाला निधीनिवास असे संबोधत. पुढे निधीनिवासचे अपभ्रंश होऊन नेवासे असे झाले.**

नेवासे भूमीत भगवान विष्णूंनी सुंदर ललनेचा अवतार मोहिनीच्या रूपाने घेतला.देव आणि दानवांनी केलेल्या समुद्र मंथनातून अनेक रत्न निघाली. जसे हलाहल(विष) अमृत व मदिरा हे देखील होते.अमृताचे देव आणी दानवात वाटप करण्याचे ठरले. देव व दानवांच्या पंगती बसल्या. स्वतः श्रीभगवान विष्णुदेव यांनी अमृत वाटपाची जबाबदारी घेतली. विष्णुदेवांनी सुंदर स्त्रीचे रूप घेऊन एका हातात अमृत व दुसऱ्या हातात मदिरा घेऊन मोठ्या कुशलतेने देवांच्या पात्रात अमृत व दानवांच्या पात्रात मदिरा वाटप सुरू केले. दानवांमध्ये राहू आणी केतू नावाचे कुशाग्र बुद्धी असलेले दानव होते. विष्णुदेवांची ही हातचलाखी त्यांच्या लक्षात आली. तात्काळ त्यांनी रूप पालट करून देवांच्या पंगतीत येऊन बसले.

**-शब्दांकन-**
**रविंद्र मुनोत नेवासकर (पुणे)**
**-संकलन-**
**पत्रकार सुधीर चव्हाण**
**मो.८८८८२१३५११**

विष्णुदेव अमृतवाटप वाटप करता करता राहू व केतू यांच्या पात्रातही अमृताचे वाटप करतात. ही गोष्ट चंद्राच्या लक्षात येते. चंद्राने ही गोष्ट विष्णुदेवांच्या लक्षात आणून दिली. क्षणार्धात विष्णुदेवांनी आपल्या मूळ रूपात येऊन सुदर्शन चक्राने राहू व केतू यांचे मुंडके उडवले. ही गोष्ट इतक्या कमी वेळेत झाली की विष्णुदेवांचे शरीर अर्धे स्त्री रूपात व अर्धे शरीर विष्णूरूपात होते. तेंव्हापासून विष्णुदेवांच्या या रूपाला अर्धनारी नटेश्वर असे संबोधले जाऊ लागले.

राहू व केतू यांचे मुंडके उडवले तेंव्हा अमृत त्यांच्या घशातून खाली उतरले नव्हते. राहूचे शिर ज्या ठिकाणी पडले त्याला राहुरी असे संबोधले जावू लागले अशी आख्यायीका सांगितली जाते. केतूच्या घश्यातील अमृताचे थेंब जवळूनच वहात असलेल्या नदीपात्रात पडले. ती नदी म्हणजे आजची प्रवरा नदी तिला अमृतवाहिनी प्रवरामाई असे ही म्हटले जाते.

श्रीविष्णुंच्या अर्धनारी नटेश्वर रूपाचे जगातील एकमेव मंदिर महाराष्ट्रात अहिल्यानगर जिल्हयातील श्रीक्षेत्र नेवासे येथे आहे. मुळ मंदिर अमृतवाहिनी प्रवरा नदीच्या तीरावर भग्नावस्थेत आहे. मुगल काळात या मंदिराची तोडफोड करण्यात आली. मूर्तींची विटंबना होऊ नये म्हणून तत्कालीन पुजाऱ्यांनी मूर्ती एका पाणवठयात लपवून ठेवल्या. आजही तो पाणवठा लक्ष्मीकुंड या नावाने अस्तित्वात आहे.कालांतराने मुगलांचे राज्य लयाला गेल्यानंतर ती मुर्ती लक्ष्मीकुंडातुन बाहेर काढून भग्नावस्थेत असलेल्या मंदिरात त्याची स्थापना करण्यात आली.

पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या पदरी नेवासे येथील गंगाधरपंत चंद्रचूड घराणे दिवाण होते.चंद्रचूड यांनी आजचे हेमाडपंती शैलीचे बांधकामात मंदिर बांधून



सन १७७० साली पूर्ण करून त्यात अर्धनारी नटेश्वर रूपातील श्रीविष्णुंच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. पुढे आहिल्याबाई यांनी त्यांना नेवाशाची जहागीरी दिली व पुढे त्यांना चंद्रचूड जहागीरदार या नावाने ओळखले जाऊ लागले. आपल्या भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड हे याच चंद्रचूड जहागीरदार घराण्याचे वंशज. आजही चंद्रचूड जहागीरदार यांचा वाडा नेवासे येथे सुस्थितीत आहे

### अर्धनारी नटेश्वर म्हणजेच श्री मोहिनीराजांच्या वार्षिक उत्सवाबद्दल माहिती

प्रतिवर्षी माघ महिन्यात यात्रा उत्सव होतो. रथसप्तमी पासून भागवत पारायणाला सुरवात होऊन माघ पौर्णिमेस सांगता होते. पौर्णिमेच्या रात्री घागरीत अग्नी / विस्तव घेउन ती घागर मंदिराच्या प्रांगणात नाचविली जाते. याला भळंद असे म्हटले जाते. घागर नाचविण्याचा मान कै.रेवणनाथ जोशी यांच्या घराण्याला असून वडाळा महादेव येथील त्यांचे चिरंजीव ॲड. आदिनाथ जोशी व त्यांची सून सौ.आदिती जोशी हे ती परंपरा आज जोपासण्यासाठी प्रयत्न करत आहे. माघ व प्रतिपदेला पालखीत मोहिनीराजांची उत्सव मूर्ती जी पंचधातुची आहे ती मिरवणुकीने ज्या ठिकाणी पुरातन काळी अमृत वाटप झाले त्या ठिकाणी नेली जाते. तहसीलदारांच्या हस्ते पालखीत गुलाल टाकून पालखी मार्गस्थ होते. त्या स्थानाला पाकशाळा म्हणतात. पुढे पाच दिवस ती सदरची उत्सवमूर्ती भाविकांच्या दर्शनासाठी ठेवली जाते. हया पाच दिवसात सायंकाळी अन्नदान केले जाते. ही परंपरा गेली १५० वर्षापासून अव्याहतपणे सुरू आहे.एक ते तीन दिवसांचे अन्नदाते हे कायमस्वरूपी ठरलेले आहेत. पाचही दिवस येथे नारदिय कीर्तनाचा कार्यक्रम होतो.

### झेंडा मिरवणूकीची परंपरा

यात्रा उत्सव काळात वेगवेगळ्या संस्था व मान्यवरांकडून मंदिरावर ध्वज लावला जातो. पहिला ध्वज लावण्याचा मान नेवासे बुद्रुक येथील कुटे पाटील घराण्याचा आहे.यात्रेच्या मुख्य दिवशी सायंकाळी पाकशाळेतून श्री मोहिनीराजांची उत्सवमूर्ती पुनः पालखीतून वाजतगाजत मंदिरात आणली जाते.याच वेळेला सायंकाळी काल्याचा कार्यक्रम होतो.दहीहंडी फोडण्याचा मान गावपाटलाचा असतो. यावेळी भक्त रेवड्याची उधळण करून काल्याचा आनंद लुटतात.

उत्सवमूर्तीची पालखी वाहण्याचा मान देशपांडे घराण्याचा आहे. त्याच रात्री साधारणतः दहा वाजता मूर्ती पुनः पालखीतून ग्रामप्रदक्षिणेसाठी मिरवली जाते.जागोजागी ग्रामस्थ देवतेची पूजा करतात.संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर, साईबाबांचे समकालीन संत नाथबाबा मंदिर असा प्रवास करीत सकाळी पालखी मुळ देवळात परत येते. उत्सव मूर्तीची विधीवत पुन:स्थापना होते. मंदिराचे विश्वस्त व यात्रा कमिटीचे सदस्य हे मानकऱ्यांसह यात्रेत आलेल्या दुकानदारांना श्रीफळ व खारीक प्रसाद सन्मान करून उत्सवाची सांगता करतात


श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
श्री मोहिनीराज देवस्थान ट्रस्ट
ए-४१८, नेवासा खुर्द, जि.अहिल्यानगर
श्री.भालचंद्र प्रभाकर बडवे – अध्यक्ष
श्री.शंकर मोहिनीराज बडवे – उपाध्यक्ष
श्री.जयेश जयंत बडवे – सचिव
श्री.स्वानंद श्रीधर बडवे – खजिनदार
विश्वस्त मंडळ
भालचंद्र मोहिनीराज बडवे, विष्णूपंत दिगंबर बडवे,
मुकुंद दत्तात्रय बडवे, अनंत रामचंद्र बडवे, विवेक वामन बडवे
संपर्क-९७६३० २९४३५

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
माऊली
प्लायवुड अ‍ॅण्ड हार्डवेअर
वॉटरप्रुफ * कमर्शियल प्लायवुड
* बी.टी.सी. मोल्डींग * एम.डी.एफ. * फ्लॅश
डोअर * लॅमिनेट्स * हार्डवेअर फिटींग
प्रोप्रा. सतीश पिंपळे
मा.नगराध्यक्ष, नेवासा
श्रीरामपूर रोड, नेवासा

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
दहिवाळकर
सराफ
प्रोप्रा. विजय दहिवाळकर
अध्यक्ष-नेवासा तालुका सराफ सुवर्णकार असोसिएशन
नेवासा फाटा, ता. नेवासा. मो.९८२२२४८४६२

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
श्री.रविंद्र पन्नालाल मुनोत (नेवासकर)
(ह.मु.पुणे)
-संतसेवक-
श्रीक्षेत्र देवगड

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
श्री.जयेश जयंत बडवे
सचिव-मोहिनीराज देवस्थान ट्रस्ट , ए-४१८ नेवासा
खजिनदार-ब्राह्मण सभा कोपरगाव.
अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ प्रदेश
कार्यकारिणी सदस्य
मो.९७६३०२९४३५

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
-शुभेच्छुक -
श्री.दादासाहेब कोकणे पाटील
मा.सरपंच-नेवासा बुद्रुक ग्रामपंचायत
संचालक
आत्मदीप मेडिकल फाऊंडेशन,
नेवासा फाटा

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
जय माताजी फ्रुट स्टॉल, नेवासा फाटा
विविध फळांचे ठोक व किरकोळ व्यापारी
प्रोप्रा.बाळासाहेब बाबुराव जोंधळे पाटील
संपर्क-मो.९०२८९७५६२१

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
-शुभेच्छुक -
जगदंबा ज्वेलर्स
प्रोप्रा.विकास के.डहाळे
ॲड.रोहन विकास डहाळे
डॉ.हेडगेवार चौक, नेवासा मो.९८५०८१२५६५, ९७६६७१४९६६

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
-शुभेच्छुक -
श्री.अनिल दिनकरराव ताके पाटील
युवा नेते
भारतीय जनता पार्टी, नेवासा
संपर्क- ९९६०६ ७१७०६
मु.पो.ता.नेवासा

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
-शुभेच्छुक -
डॉ.सौ.मनिषाताई भाऊसाहेब वाघ पाटील
राज्य उपाध्यक्ष-भाजपा वैद्यकीय मोर्चा
स्त्रीरोग तज्ञ प्रसूती शास्त्र
(नगरसेविका)
वाघ हॉस्पिटल
बाजार तळ, गरूटे गल्ली, नेवासा

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
-शुभेच्छुक -
श्री.गुलाबचंद बन्सीलाल गांधी
शुगर ब्रोकर नेवासा
प्रो.श्री.सूर्यकांत गांधी
प्रो.सागर गांधी
मो.९०२८८५९९९९, ९८५०५४२५४२
स्व.अशोकशेठ गुगळे मित्रमंडळ, नेवासा

श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
-शुभेच्छुक -
श्री.अनिल गव्हाणे
-मंडल अधिकारी-
नेवासा तलाठी कार्यालय
-मार्गदर्शक-
नेवासा तालुका तलाठी महासंघ
नेवासा, जि.अ.नगर